मराठी ग्रंथ संग्रहालय

सन १८६१

(ठे. विनायकजनार्दनकीर्तने.

धवराव पेशवे.

स प्रत.

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे)

[illegible]
दि. ........

To Marathi Grantha Sangrahalaya
Thane.
Compliment from
8/8/86

ग्रं. सं. राणे

# थोरले माधवराव पेशवे यांजवर.

राजश्री विनायक जनार्दन कीर्तने

निसबत एल्फिन्स्टन कॉलेज,

यांणी रचून

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा येथें वाचिलें.

तें सभेच्या आश्रयावरून

गणपत कृष्णाजी याच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मुक्काम मुंबई.

किंमत ६ (सहा) आणे.

सन १८६१.

# नाटक,

# थोरले माधवराव पेशवे यांजवर.


राजश्री विनायक जनार्दन कीर्तने,

निसबत एल्फिन्स्टन् कॉलेज,


यांणी रचून

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे पुढें वाचिलें;

तें सभेच्या आज्ञेवरून


गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

मुक्काम मुंबई.

किमत ६ ( साहा ) आणे.

सन १८६१.

# जाहिरात.

सर्व लोकांस जाहिर केलें जातें कीं ज्यांस हा ग्रंथ घेण्याची इच्छा असेल त्यांणीं आपलें नांव व ठिकाण लिहून **ज्ञानप्रसारक** सभेचे चिटणीस राजश्री नारायण महादेव परमानंद यांचा नांवें गणपत कृष्णाजी याचें छापखान्यांत पोष्टपेड पत्रें पाठवावीं. तीं पुस्तकाची किंमत साहा आणे व बंगीचें हाशील एक आणा मिळोन सात आणे सुद्धां पाठवावीं ह्मणजे त्यांस हीं पुस्तकें पाठविली जातील.

हीं पुस्तकें पुण्यांत पाठशाळेंतील अशिष्ट प्रोफेसर राजश्री बाळा मंगेश यांजपाशीं मिळतील.

रत्नागीरींत राजश्री श्रीधर नारायण जोशी वकील यांजपाशीं मिळतील. पुस्तकाचा पावत्या बाळाजी बापुजी साने यांचे नावाचा केल्या जातील.

# प्रस्तावना.

काहीं दिवसां मागें मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्यें रा० **विनायक जनार्दन कीर्तने** यांणीं **थोरले माधवराव साहेब** याच्या कारकीर्दीचें वर्णन नाटकरूपानें लिहून वाचिलें. तें ऐकून सर्व सभेस फार आनंद झाला इतकेंच नाहीं, तर, राजमान्य रा० **डाक्तर भाऊदाजी** व रावसा० **महादेव गोविंद शास्त्रि** इत्यादिक विद्वान व थोर गृहस्थाच्या स्तुतीसही तें पात्र झालें. असें पाहून याचें लहानसें पुस्तक निराळेंच छापून प्रसिद्ध करावें असें बहुतेक सभासदास व कित्येक इतर गृहस्थास वाटल्यावरून, सर्व लोकास तें सुलभ किंमतीत मिळून मराठी नाटकाविषयीं अभिरुचि उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें हें पुस्तक आम्हीं छापून प्रसिद्ध केलें आहे तर मराठी भाषेचें कल्याण इच्छिणाऱ्या सर्व लोकांनी यास यथाशक्ति आश्रय द्यावा हें उचित आहे.

मराठी भाषेंत नाटकें लिहिण्याचा हा प्रारंभच असून या लहानशा नाटकांत नाटककारानें हास्य व करुणारस चांगले उतरून पुस्तक मनोरंजक केलें आहे हें पाहून नवीन ग्रंथकार नाटकसंग्रहानें आपली भाषा ऊर्जित दशेस आणण्यास उद्युक्त होतील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

या पुस्तकांत कोठें कोठें अडाणी लोकाची भा-

## प्रस्तावना.

षा आली आहे. या गोष्टीस उपाय नाहीं. कारण, मराठी दरबारांत शिपायापासून तों सरदारापावेतों सर्व हीच भाषा बोलतात. कित्येक ब्राह्मण कारभारी असतात ते मात्र आपण बोलतों असें बोलतात. परंतु बाकी सर्व अडाणी भाषाच बोलतात. आणि ज्यापेक्षा ग्रंथकर्त्यांचा उद्देश मराठी दरबाराचें वास्तविक स्वरूप दाखविण्याचा आहे त्यापेक्षा पात्रानुरूप भाषाही बदलणें अवश्य पडलें. ही गोष्ट सूज्ञ लोक लक्षांत ठेवितील अशीही आमची आशा आहे. मु० मुंबई

एप्रिल सन १८६१

बाळाजी बापुजी साने.

श्री

## नाटक. पहिले माधवराव पेशवे.

### नांदी.

सर्व ब्रह्मांडाचा उत्पत्तिस्थितिलयहेतु जो सच्चिदानंद तो आपलें संरक्षण करो, व मला बुद्धि देवो.

अंक १.

प्रवेश १.

**विदूषक**—अरे सूत्रधारा, आज तूं हा कशाचा श्वटाटोप मांडला आहेसरे ? हे लोक काय कारण योजून येथें आले आहेत ?

**सूत्रधार**—तुला कांहीं एक वार्ता देखील ठाऊक नाहीं, अं, तर मग तूं रे काय कारण योजून आलास ?

**विदूषक**— मी, मी ? तूं मला सांगितलेंस कीं विदूषका, प्रयोजन आहे, चल; म्हणून मी आपला गरीब ब्राह्मण आजचादिवस तरी तूपपोळी चळचळित मिळेल, अशा बेतानें कांखेंत सोवळेंभाईं मारून आलों. आणखी, सूत्रधारा, हा माझा मुलगा ही आणिला आहे, पाहा. दुप्पट दक्षिणेचें संधान.

**सूत्रधार**— विदूषका, तूं अकलेचा पूर्ण सागर दिसतोस, गड्या.

**विदूषक**— तो कसारे ?

**सूत्रधार**— कसारे ? अरे, मी काय तुला सांगितलें? विदूषका, तुझें कांहीं प्रयोजन आहे, चल.

**विदूषक—** मग मी काय बोललों ? तुला प्रयो-जन आहे म्हणजे मेजवानी आहे, चल.

**सूत्रधार—** पुनः आपलेंच. अरे तुला प्रयोजन नव्हे, तुझें प्रयोजन आहे, चल. प्रयोजन म्हणजे कारण.

**विदूषक—** हंहं; आता उमजलों. माझें कारण आहे काय ? मग बरें आहे. काय म्हणतोस ?

**सूत्रधार—** माझें साहित्य कर.

**विदूषक—** मी असा तुझ्यासारिखा दुतोंड्या नाहीं. प्रयोजन नाहीं ह्मणतोस, आणि साहित्य तर कर म्हणतोस. तुझें खरें काय समजावें ? मी आपला निघोन जातों कसा. नाहींतर एक काय तें सांग.

**सूत्रधार—** साहित्य म्हणजे पापड, साडगे, लाडू हें नव्हे, बाबा. साहित्य कर म्हणजे मदत कर. आज माझ्या दैवानें विदूषक तर मला फार विद्वान् मिळाला आहे.

**विदूषक—** असें काय तें काम माझें. तू आतां काय करणार तें साग म्हणजे त्या सारखी मदत.

**सूत्रधार—** ऐक तर सागतों. हे श्रोतेहो, तुह्मीही ऐका. हे विदूषका, आज मी यालोकांना मराठी दर-बारांत नेऊन तेथील हलहवाल दाखविणार. तें कोणतें मराठी दरबार जर ह्मणशील, तर, बाबा, आतांचें नव्हे. ज्या दरबारात परद्वीपस्थ लोकांच्या आज्ञा चालतात, व राजे केवळ पिंजऱ्यातील पोपट असून स्वसत्तेच्या छा-येस देखील ओळखीत नाहींत, अशा ठिकाणी मीं यां-ना कशासाठीं नेऊं ? तर थोरले श्रीमत माधव-
हेव पेशवे, की ज्यांनीं प्रजेचें पोटच्या

तिपालन केलें, ज्यांचें नांव ऐकिलें असतां मुसलमानांनीं थरथरां कांपावें, व ज्याच्या वियोगेंकरून सर्व महाराष्ट्रदेश उदासीन होऊन ज्याला निस्तेज पडला, त्या सत्पुरुषाच्या दरबारीं यांस नेतों; आणि तेथील चमत्कार दाखवितों.

**विदूषक**— सूत्रधारा, अशी स्तुति करण्याची तुझी चालच आहे. पण यांना तूं मराठी दरबार कां दाखवितोस हें मी समजलों. अरे, चोराच्या वाटा चोराला ठाऊक. तुझ्या मनांत मराठी राज्यांत यास नेलें ह्मणजे दादना फिर्याद, सर्व बुचाडून घेऊन, अलख गोसावी करून परत पाठविण्यास चिंता नाहीं. पाहाहो, बाबांनो! तुमच्या मनांतून धड घरीं निघून जावयाचें असलें तर आपले चालते व्हा, नाहीं तर पेंढाऱ्यांचे बडगे आले ह्मणून समजाच. कां सूत्रधारा, होय कीं नाहीं, बोल.

**सूत्रधार**— तुझें बोडकें बोल, आतां. कोणत्या नक्षत्रावर जन्मला कोण जाणे, हा राजहंस. शेणाचा दिवा ओंवाळा. कोठें बाप तपश्चर्या करीत बसला होता तें हें रत्न पोटीं आलें, लोकांना या या ह्मणून सांगावें, तो हा शहाणा जाजा ह्मणून सांगतो. हेंच साहित्य करणार कायरे?

**विदूषक**— सूत्रधाराला राग आला. बरें बाबा, जाजा नाहीं याया ह्मणतों. या हो या, आमचा सूत्रधार तुह्माला मराठी दरबारांत नेऊन लुटणार, या हो या. तमचीं पागोटीं द्या हो द्या. आमचा सूत्रधार तुह्माला ...णार, या हो या. झालें आतां?

... झालें ह्मणजे, असा दिवटा साह्यकारी

असल्यावर होणार नाहीं काय ? पण विदूषका, मराठी राज्य केवळ लुटारू होतें असें तूं समजूं नको. तुझ्यासारख्या शहाण्यांची मात्र ही समजूत. माधवरावाच्या राज्यात कसें होतें तें आताच दिसून येईल. तू घटकाभर स्वस्थ जर असशील तर सर्व चमत्कार दृष्टीस पडतील. (श्रोत्यांस पुनः) हे श्रोतेहो, आतां तयार व्हा. कंबरा बाधा. वायूपेक्षांही जलद वेग देऊन तुमचीं हीं दृश्य जडें येथेंच जों बसलीं आहेत तोंच तुह्मास साताऱ्यास नेऊन, तेथून पुण्यास आणून, दाखवायाचें तें दाखवून, पुनः येथें सोडितों.

(पडदा पडतो) (सूत्रधार व विदूषक निघून जातात.)

## प्रवेश २.

सातारा. राजवाड्यांत दिवाणखान्याच्या बाहेरील जागा.

सदोबा भालदार व गणोबा चोपदार.

**सदोबा**— रामराम, गनबा.

**गणोबा**— रामराम, रामराम, सदबा, रामराम. कां सदबा, भोजन बिजन करूनशेनी आला कीं ऱ्हाइव ?

**सदोबा**— त्येकशाला, गनबा, पुसावन्. आज सरकार कचेरी हायना. ह्योच सरकार सवारीची आज्ञा घेऊनशेनी ग्येलोतो. अन् बगा बायकोन काइ भाकरी काइ कोरड्यास ठ्येवलत त्ये बिगिबिगिशी झटदिनी घेतल अन बगा भोजन बिगियान आटपुन डोइवर मुंडासच ठ्येवल बगा अन् अ...

बगा तुमची गाट पडली बगा.

गणोबा— आपुनबी तसच बगा. काय म्हन त्यात न्हाई परसादिन जिन. आज पुन्यासल मुकत्यार आल्यात म्हनुनशेनी इतका थाट केलाया. आपल्या बगन्यात येकुन असा थाट व्हवताच बगा.

सदोबा— अव त्ये काय राव म्हनता तुमी ! ता लिवार त्ये तालिवार. तुका म्हन उगी व्हाव अन् ज्येज्ये व्हइल त्येत्ये पाव. आतां गनबा, तुमी कुनिकड चालला.

गणोबा— सरकार स्वारिच सुक होऊन शेनी पोषाक चाललाया म्हनुन दिवानखान्यांत सव्यांस्नी वर्दी द्याया चाललों. तयारी अगदि मजी आगदि झालिया. आता सवारी भाइर येइल. तुमी बी चला चनी. अन् काय.

सदोबा— आपुन त तयारच हावोत. हा निगालो बगा, रामराम.

गणोबा— रामराम.

( दोघे निघून जातात )

( पडद्या पलीकडे शब्द होतो. )

## प्रवेश २.

रामराज महाराज छतरपती हिंदुपत बादशाहा. खडीताजीम. नजर रखो, महाराज.

( रामराजा सिंव्हासनावर जाऊन बसतो, नंतर मुजरे होतात. )

भालदार चोपदार पुकारतात { रघुनाथराव, माधवरावपेशवे, पत प्रधान,

... छतरपती.

...धी, अमात्य, सचिव; हिंमत बाहादर,

सरलश्कर, निंबाळकर, घाटगे, मोहिते, खडीताजीम महाराज.

( सर्व बसल्यानंतर. )

रघुनाथराव— सरकारपायांवर घालण्यासाठीं नानासाहेबांचे चिरंजीव माधवराव आणले आहेत. आजपर्यंत त्यांचा सरकारांनीं परामर्ष घेतला तसाच यांचाही घेणें होतच आहे. अर्ज मिळोन इतकाच.

रामराजा—( माधवरावाकडे बोट दाखवून ) नानासाबाचे च्यरंजीव. तोंड त लइ सारक. जनु त्येच. नांव ?

माधवराव— सरकार, मला माधव ह्मणतात.

पंतअमात्य— प्रकृति सौम्य, व माधवराव साहेबांच्या आंगीं लीनता आणि साधेपणा फार.

रघुनाथ ०— हुशारीहि तशीच आहे.

निंबाळकर— दादासाब, माशाचं पिलहु. पव्हायला शिकवन नग. सिंवाच्या बच्चास्नी हात्ती दावाया न्हाइ लागत.

रामराजा— व्हय, अनू, कां दादा ( रघुनाथरावास ) नानासाब बी लइ चांगला परानी. सावध, शाना, अन, राजकारनी. त्येन बगा योका कामाला शंबर युक्ती लडवून पाव्या.

रघुनाथराव— जी, सरकारच्या ध्यानांत असलें ह्मणजे झालें.

रामराजा— कां माधवराव, आतां तुमी आमचकारबारी, तुमच्या तिर्थरुपाच आमास्नी इस्मरण्डा, मर्जी झाल.

**माधवराव**— जी,सरकारपांयांची कृपा असली ह्मणजे-हो आमचा सेवकधर्म, चाकरी घेणें पायांकडे आहे.

**सचिव**— ठीक. (हिम्मत बाहादरास ) का उत्तर कसें योग्यआहे, पाहिलेंना ?

**हिम्मत०**— त्येकाय,— सरकारच इचारन बी लइ गोड; अनि उत्तरबी लइ गोड.

**रामराजा**— खजिन्यावरच कामगार कुट हायता ? अन् अटरा कारखान्यावरच बी?

कामगार दो- } आज्ञा, हजर सरकार. वस्त्राची तयारी
हीं कडील } आहे, सर्व गोष्टींची तयारी आहे महाराज.

**रामराजा**— आना, त, वस्त्र.

**खजिनदार**—आज्ञा महाराज. (वस्त्रें आणून देतो)

**रामराजा**— या माधवराव, घ्या.

**रघुनाथ०**— व्हा व्हा, पुढें व्हा.

**रामराजा**— ( वस्त्रें दिल्यानंतर ) आतां नीट खबरदारीन कारबार करा. नानासाबाच आमास्नी लइ-दुक झाल, अपरंपार. पन तुमास्नी पावून आता संतोस झाला. त्यो बगा, हिम्मतभादर मला मह्रा दुःकाचा दीसग्येला.

**हिम्मत वाहादर**— काय सांगु सरकार. अन मी सूर्व्ये नारायनाला अरग्य देत होतों. अन् पुकारा-झाला नानासाब ग्येल्याचा. अन सरकार झालार-झालाधात झटलन, आरग्या गळाला. अन् त्योच सरकैनाला बातमी घ्येवी ह्मनुनशेनी आलो. त्यो —. आता ठीक झाल.

तासांवरील— अकराव्याचा अंमल हाय. घडी भरत आली, महाराज.

( पानसुपारी वाटतात आणि नंतर कचेरी बरखास्त होते )

## प्रवेश ४

सूत्रधार व विदूषक.

वि० कायरे सूत्रधारा, कशाचीरे कचेरी ही! विडे वाटणारानें मला वेलदोडे बिलदोडे कांहीं दिले नाहींत; अशी कोठें चाल असते?

सू० अरे, मग मागायाचें होतेंस कीं नाही ?

वि० अरे तो कोठला खडतर हतारा वाटणारा होता; तो लवंगा देखील देईना.

सू० लवंगातरी तू मागितल्यास?

वि० मागितल्या ह्मणजे! तुझ्या मनांत राहतों काय? तो कसला खाट ! मला ह्मणाला, थांब, लवगाबद्दल तुझ्या घशात मिर्चाची पूड कोंदायास आणतों; नाहीं तर नाहीं, पण हा विदूषक राजाचा मान कायरे! थुः!थुः!थुः!त्या कचेरीच्या तोंडावर थुः!त्या ह्माताऱ्याच्या तोंडावर थुः!.

सू० अहो विदूषकराजे, रागावूं नका, पुण्यास तर तुह्मी चला;तुमची चंगाळी देतों उडवून; तेथें माझी ओळख आहे, पशानें वेलदोडे तुझ्या तोंडांत भरतों; चल तर खरा.

वि० लुच्चा आहेस तूं; त्या ह्मातार्याचा बाप तूं; गुलामा कोल्ह्या, वेलदोडे मात्र खाशील तूं आणि पठें तेवढें माझ्या घशात कोंदशील.

सू० नाहीरे, त्याची का तुला काळजी ?

वि० का काळजी ! माझ्या घशाची मला नको काळजी, तर का तूं वाळगशील ?

सू० पुरेरे बाबा, तुझी, बडबड; सोलून दाणेदाणे तुझ्या घशात घालीन. उमजलास ?

वि० मग चिंता नाहीं; मग चल तर; आता कोतवालघोड्यासारिखा नाचत येतों; चल. ( दोघे निघून जातात. )

## अंक २.

### प्रवेश १.

पुणें—शनवारवाड्यांतील कचेरी

रामाजीपंत व चिंतोपंत ( दोघे कारकून )

रा० कां चिंतोपंत, श्रीमंताची स्वारी कोणीकडे आहे ? तुह्मी अगदीं जवळ असणारे लोक ह्मणून विचारितों.

चि० जवळ असणारे, अगदीं जवळ असणारे खरे. श्रीमंत कांहीं राजकारणी बेतात गुंतले आहेत; तेथेंच रघुनाथ राव दादा, सखाराम बापू, त्रिंबकमामा, रामशास्त्री बावा, आणखी कांहींकाहीं जडपार्डीं बसलीं आहेत.

रा० मामा ! त्रिंबकराव मामा ! अहो ते दक्षिणेंत गेले होतेना?. दोनचार दिवसापूर्वीं आले वाटतें. ऐकत होतों तिकडून खडणी घेऊन येतात ह्मणून; बाळाजीपंत ह्मणत होते. एकुण मामाची स्वारी आली अँ ? ही ...न कितीवेळ झाला ?

...— झाला, तासएक होत आला. काय-

सांगूं? श्रीमंतांची कामाविषयीं दक्षता, शाहणपण आणि जलदी हीं कांहीं कोणाला साधायाचीं नाहींत. अल्पवयात असेगुण असणें फारविरला. पण जाऊंद्या, मला कांहीं कामासाठीं जावयाचें आहे तेव्हां लवकर गेलें पाहिजे. ( निघून जातो )

## प्रवेश २.

माधवराव साहेब पेशवे, रघुनाथराव दादा,
त्रिंबकमामा, रामशास्त्रीबावा, सखारामपंत,
आणखी कोणीकोणी मंडळी.

**रघुनाथराव**— मामा, माझी मी सल्लादिली. बोला, आता परचक्रतर अगदीं नजीक येऊन ठेपलें. काय आगावर तुटून पडावें, कीं आपण आपल्या गोठांतच लपून असावें. कसें करावें ? मलातर बेलाशक आगावर तुटून पडावें असें वाटतें.

**त्रिंबकमामा**—दादा, मला असें वाटतें. आपण होऊन ऐकून घ्या,— आपण होऊन निजाम अल्लीच्या आंगावर जाण्याच्या खटपटींत पडूंनये. आपल्या गोठांत मात्र तयारी कडेकोट ठेवावी. तो जवळ आला ह्मणून चिंतानाहीं. आणि त्याहीं पेक्षां— हीं आपलीं लश्करें थकून आलीं आहेत. तूर्त आपला कमीजोर आहे, तेव्हां सोईची गोष्ट करून त्याची समजूत पाडावी हें बरें. आतां मजकडून ह्मणाल तर लढाईला येव्हां याक्षणीं सिद्धता आहे. परंतु उत्तम पक्ष हा दिसतो. यावर श्रीमंत काय ह्मणतात तें समजण्यांत आलें पाहिजे.

**रघुनाथराव**— छेःछेःछे हा अग

ला, यांतकांहीं अर्थ नाहीं. मारिलाऊन केव्हां पाहि-
ली होती कीं नव्हती अशी खोडकी जिरवावी त्या
यवनाची. मामा ह्मणतात अशांत भागुबाईपणा येतो.
समरांगण गांठण्यासारखी मौज नाहीं. असें हि करि-
तां जरी पराजय झाला तरीं भागुबाईपेक्षां बरें. का-
रामशास्त्रीबावा ?

**रामशास्त्री**— आपणा उभयतांच्या बोलण्यावरून
असें अनुमान होतें कीं वर्तमानकाळीं स्वकीय सैन्या-
चा गौण पक्ष आहे. अतएव युद्धसंग्राम नकरितां
याव्यतिरिक्त अन्योपायाची योजना करून पर-
चक्राचें निवारण करावें हें उचित दिसतें. तस्मात्
मामा जें ह्मणतात त्यास माझें अनुमोदन आहे. आतां
यावर श्रीमंतांची काय आज्ञा होणें ती होईल.

**माधवराव**— दादा, मामा, शास्त्रीबावा यांणीं
अनुक्रमानें आपआपलें ह्मणणें कळविलें. सखारामपंत.
आता तुह्मी आपलें कळवा ह्मणजे झालें.

**सखाराम०**— माझाकांहीं निराळा अर्ज नाहीं.
दोन्हीही युक्ति आहेत.

**रामशा०**—सखारामपंत, असें बोलण्याची ही वेळ
नव्हे.

**त्रिंबकमामा**— दादाचा विचार माझ्यातर पस-
तीस मुदलीच येत नाहीं. कांहीं करणें तरी प्रसंग पा-
हून करणें हा प्रशस्त मार्ग आहे. राज्यकारभारात
युक्तिप्रयुक्ति सर्व ठिकाणीं जोडल्या पाहिजेत. केवळ
धर कीं झोडप, मारीन किंवा मरेन. असें ह्मटल्यानें व्य-
... नसते.

**राघोबा०**— नाहींतर कायमामा, घरीं बसल्यानें व्यवस्था होत असते ?

**त्रिंबकमामा**— घरीं बसावें असा विचार मी श्रीमंतांस दिलाच नाहीं. परंतु घरीं बसून कार्य सिद्धि योग्यरीतीनें होत असल्यास त्यात ह्मणजे भागुबाईपणा येतो असें मला वाटत नाहीं. कांहीं होवो पराजय कां होईना. लढाई करावयाचीच हा अविचाराचा दुराग्रह आहे. दादा आपण असें बोलता हाच चमत्कार.

**माधवराव**— हें ठीक नाहीं. अहोदादा, अहोमामा. शत्रूच मात्र वाद करण्यास योग्य. त्यांशीं भांडणें सोडून आपण आपल्यांतच कलह मांडला तर कसें ? मामा ह्मणतात तें मलाहीं बरें दिसतें. ज्या अर्थीं आपलें लश्कर थकलें आहे व कमीही आहे त्या अर्थीं निजामअल्लीची समजूत पाडून त्यास परतावें हें ठीक, त्यांतच कार्यसिद्धि आहे. यवनांच्या गर्वाचें खंडन करण्यास आणखी पुष्कळ मसग येतील. सखाराम पंत, निजाम अल्लीचा काल काय निरोप आला तो पुन: सांगा पाहू ?

**सखारा०**— त्या यवनाच्या ह्मणण्यात आपण त्यास बेदर, औरंगाबाद वगैरे त्याजपासून घेतलेले सर्व मुलुख सोडावे.

**माधवराव**— त्याला अशी थैली लिहा की बेदर आणि औरंगाबाद मिळून आह्मी तुह्मापासून आज तागाइत साल दरसाल सत्तावीसलाख रुपये घेत होतों त्यास ही थैली पाहातांच तुह्मी येथून ठाणें उठवून जर निघून गेला तर बेदर आणि और-
लचे सदरहु २७,००,००० रुपये आह्मी

परंतु ठाणें जर न उठवाल तर पेशव्यांची शक्ति किती आहे हें दाखवूं. लिहा— सखाराम पंत असी थैली लिहून आतां शिक्कामोर्तब करावयास घेऊनया.

**सखारा०**— जी आज्ञा. लिहून आणतों ( निघोन जातो. पाठीमागून राघोबादादा ही कांहीं काम आहे ह्मणून निघोन जातात. )

**त्रिंबकमामा**— दादांना राग आला आहे असें दिसतें. आपण युक्ति काढली हीच ठीक. दादाचें बोलणें थोडें अविचाराचें होतें.

**रामशास्त्री०**— क्रुद्ध मुद्रा दिसली खरी. परतु त्यांत अर्थ काय ! झालें हेंच यथायोग्य झालें.

**माधवराव**— ( हसून ) दादांची प्रकृति थोडी तापट आहे. ह्मटलें असता झालें यांत त्यास राग यावा असें कांहींच नाहीं. व असें करण्यात त्याचें मन दुखवावें हा आमचा हेतु ही नाहीं. असें ही असता त्यांना राग आला असें दिसतें. असो वडील आहेत. ( पुनः हंसून ) तीर्थरूप गेले त्याच्या पाठीमागें हेच आमचा सांभाळ कर्ते. तेव्हां राग जरी आला तरीं राहायाचा नाहीं. चला आतां. कोणीकडोन एक तर काम उरकलें. दादांची समजूत मग पाडता येईल. बरें आहे, जा आतां. ( सर्व उठून जातात )

## प्रवेश ३.

### राघोबादादा व सखारामबापू.

**राघोबा**— कां सखारामबापू –( रामा दारघेओढून) कांबापू चमत्कार कसाआहे पाहिलातना? आह्मीआज ...दिवस कारभार पाहिला पण आज मूर्खठरलों.

आह्मालाच समजेना. आह्मालाच उमजेना. कायशाहाणे ते तोमामा आणि तोशास्त्री. माधवराव काल नागवा फिरत होता. अझून तोंडाचाजार नाहीं वाळला. ओंठपिळलातर दूध निघेल. आणि आज मला सवाहात लांब गोष्टी सांगूं लागला. " मामाह्मणतात तें बरें दिसतें, त्यातच कार्यसिद्धि आहे " असा मला बुद्धिवाद करितो. मी येवढा झालों, माझ्यापेक्षां हापोर शाहाणाकायहो ? कायबापू एकएक चमत्कार सागूं ! आताच्या काळचीं पोरेंच अशीं. नाहीं तर मी सांगेन तें याणें निमुटपणें ऐकावें. बरें आता पाहातों. कसें माझ्याशिवाय राज्यचालतें तें पाहातोंना आतां. तेथें तोंडानें गोष्टिनाहीं सांगायाच्या. उद्यां उजेडूंतरद्या; साफआह्मी काम पाहात नाहीं असेंमी ह्मणणार. हासगळा पोरखडा होणार. यांतकांहीं अर्थ नाहीं. तुह्माला सांगतों मी सोडिलें कीं लागलीच तुह्मी कामसोडा. आणखी जितके आपल्या पक्षाचे आहेत तितक्यांना अशीच ताकीद द्या. असें केल्यावर माधवराव जर दुसरे दिवशीं न पायांपडेल तर माझें नाव निराळें कां करें ? तुमच्या मनास येत नाहीं असें दिसतें.

**सखाराम** ०—माझ्याकडून ना नाहीं. आपण जो बेत कराल त्यांत मी आहें. जोंपर्यंत याशरिरांत अस्ति आणि चर्म आहे तोंपर्यंत मी आपल्या शिवाय कोठेंहीं व कधींहीं राहणार नाहीं. आपण जी आज्ञा कराल ती करण्यास मी सदा तयारच आहें, याविषयीं आपल्या मनात तिळमात्र संशय येऊं नये.

**राघोबा**०— हींच तर तुमची आमची

क. उद्यां सूर्य जों क्षितिजावर आला नाहीं तोंच माधवरावाच्या कारभारांत घोंटाळा करून सोडितों. आपण कामांतून निघालों ह्मणजे अर्थात झालेंच हें. यांत कांहीं संशय नाहीं. हें तुह्मी समजून ठेवा. चला आतां आपण जाऊं. उद्यां असें करायाचें बरें ? आज सर्वांना अगदीं ताकीद करून ठेवा.

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश ४.

रघुनाथरावाचा दिवाणखाना.
रघुनाथराव व आनंदीबाई.

**रघुनाथ०** — ( मनाशींच ) कायबेटा चमत्कार ! हं:!शाबास—अरे मी रघुनाथराव आणि मला असें ह:! काळच तसा आला आहे. हं.

**आनंदीबाई**— कां आज लवकर येणें झालें. जायाचें तेव्हां ह्मणायाचें कीं " आज बावा मला उशीर होईल. कांहीं फार निकडीचें काम आहे " आणि यायाचें तर लवकर. तेव्हां लोकांनीं त्या बोलण्याचा काय नेम धरावा ?

**रघुनाथ**— अगे आतां काय, लवकर काय आणि उशिराकाय. सगळाच चमत्कार आहे. आजचें तुला वर्तमान काय ठाऊक आहे ?

**आनंदीबाई**— तें काय बाई. येथून गडबडीनें जायाचें उशिरानें येईन ह्मणोन, तेवढेंमात्र मला ठाऊक. काय झालें काय ?

**रघुनाथराव**— अगे, आह्मी ह्मणजे त्या माधवरा-[illegible]ना झाडाचा पाला असें वाटतें. उद्यां साफ

आह्मी काम पाहात नाहीं ह्मणून सांगणार. मग पाहातोंना कसा राज्यकारभार चालतो तो. तसेंच सखारामपंत, तसेंच सर्व मंडळी करणार. तूं पाहा तर खरी त्याची कशी व्यें करून टाकतों.

**आनंदीबाई**— असें झालें तरी काय? माधव कांहीं बोलला कीं काय?

**रघुनाथ०** — अगे बोलायाचें तें काय. आह्मी सांगितलेलें ऐकत नाहीं आणि तो मामा सांगेल, तो शास्त्री सांगेल तें खरें — तो बाळकृष्णबावांच्या जाग्यावर ठेविला आहेना, तो शास्त्री. पोरखेळ मांडला आहे आणि काय?

**आनंदीबाई**— आतां समजलें. हा सगळा त्या रमाचा खेळ आहे. ती दिसायाला मोठी भावडी दिसती, पण अगेबाई मोठी खबरदार बायको आहे हो; तिचा हा खेळ.

**रघुनाथ०**— तें काय? रमाचा खेळ कसा? असेल बाबा कोणी सांगावें? या आतांच्या पोरी काय नवऱ्यांना सांगतील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं. काय रमाचा खेळ! कसा कसा सांगसांग बरें.

**आनंदीबाई**— मामा जेव्हां आले तेव्हां अगोदर माधवरावाकडे गेले, आणि मग रमाच्या महालांत गेले तेथें (रघुनाथरावाकडे बोट दाखवून) विषयीं कांहीं कांहीं बोलले. "सगळें हातींच असायाचें. स्वभाव कांहीं चांगला नाहीं. माधवरावाचें कांहीं चालूं द्यायाचें नाहीं असा बेत असायाचा"— येक कां दोन—अशीच भाकड कथा सांगत होते, ती रखमाई रमाची लुगडें नेशीवणारी ती मला सांगत होती. तेंच र

कांनीं सांगितलेलें ऐकून घेऊन नवऱ्याजवळ बोलली असें वाटतें. नवरा काय मेला दळ्या बाईलबुद्ध्या ह्मणून असें झालें.

**रघुनाथ॰**— असें काय? हें आतलें कोणाला ठाऊक? ही बायकांची सागणी आणि नवऱ्यांची ऐकणी आपल्याला नव्हती कधीं ठाऊक. गादीवर बसलें ह्मणजे झालें असें नाहीं कांहीं. बरें आतां पाहतों. कसा कारभार चालतो तें पाहातों. दुसरे दिवशीं जर पाया न पडला माझ्या, आणि दादा कारभार पाहा न ह्मणाला, तर तुला उजवी मिशी देईन उतरून.

**आनंदीबाई**— हो, येईलतर काय झालें. पण मगएक किर्तीका पायापडेना. मी नाहींच येत. हेंच उत्तर. मग अर्धेराज्य द्यावें तेव्हा काम पाहावें. असें केलें ह्मणजे त्याची खोडकी जिरेल आणि त्या मेल्याचे डोळे उघडतील.

**रघुनाथ॰**— आतां तोच बेत धरला आहे अर्धें राज्य घेईन तेव्हां काम पाहीन. हाच निश्चय.

## अंक २. प्रवेश १.

माधवरावाचा दिवाणखाना.

माधवराव साहेब, त्रिंबक मामा, गोपाळराव पटवर्धन, आपा बळवंत, मल्हारराव रास्ते, नानाफडनवीस, रामशास्त्री बावा.

**त्रिंबकमामा**— आज इतक्या प्रातःकालीं लगबगीनें बोलावू कां पाठविलें? जासूद आला आणि आतांच आहे ह्मणाला, ह्मणून जपजाप तसाच

राहिला; फक्त संध्या झाली होती आणि तसाच आलों.

**माधवराव**— ठीक केलें. तसेंच कांहीं निकडी-चें काम आहे ह्मणून बोलाविलें. जपजाप काय मग होईल. काल निजाम अल्लीविषयीं निर्णय ठरवून मी आपल्या ह्मणण्याप्रमाणें हुकूम दिला. त्यावरूनवा-टतें दादांस राग आला. आज आपला आयने महालांतू-न बाहेर आलों तों दादा, सखारामपंत, व आणखीं कित्येक बाहेर उभे होते. तेव्हां काय ह्मणून विचारिताच लागलींच राजीनामे दाहापाच असामींचे स्वाधीनकेले. मग दादास मी ह्मणालों " असें करण्याचें कारणकाय?" तेव्हां त्याणीं उत्तर केलें कीं कारण ह्मणून कांहींनाहीं. उगीच कारभाराची कटकट कशाला पाहिजे ह्मणून आह्मी सोडितों. मगमीतरी कशाला आग्रह धरूं. तेथून निघालों तों येथें आलों.

**त्रिंबकमामा**— हा काय विलक्षण राग. त्यांच्याम नांत आह्मीजरी वास्तविक सांगायाचें तें सांगितलें तरीं आपण आमचें न ऐकतां आपलें ऐकावें.

**गोपाळराव**०— सरकारी कामांत अशा गोष्टींचा राग काय उपयोगी? दादांनीं येवढी तेवढी गोष्ट मनांत धरावी हें ठीक नाहीं.

**माधवराव**— तें सगळें खरें. पण येऊन बेतली पुढें उपायकाय बोला? मी, शास्त्रीबावा, आपल्याकडून सांग-तों, मी ह्मणून दादांना तुह्मीयाच असें ह्या तोंडानें ह्मणणा-र नाहीं. त्यांना वाटलें असेल माधवराव काय पोर आहे, आपल्या शिवाय त्याच्या हातून काय होणार? ते व्हां आपल्याला येवढें तर पाहिलें पाहिजे कीं त्यांच्या शिवाय चालतें कीं नाहीं. चालतें तर बरें आ

समजतील, नचाललें, तर त्यांचा वडील मानच आहे; आपणास त्यांच्या पायापडायास काय हरकत आहे ? का शास्त्रीबावा, आपण न्यायाधीश आहां, येवढा न्याय उलगडा आतां.

**रामशा०**— दादांनीं फार अनुचित कर्म केलें; आ-तां मला हा राजमार्ग दिसतो कीं आपण कोणी योग्य-यथाशास्त्र, यथान्याय वागणारा, चतुर, लोकप्रिय गृहस्थ पाहून त्यास कारभाराचें प्रमुखत्व देऊन आपण स्वतः राजधर्म पाहवा आणि राजक्रिया चालवाव्या. आपल्यासारख्यानीं कोणावर अवलंबून असूंनये.

**माधवराव**— सर्व गोष्टींत शास्त्रीबावा आह्मास गुरूचे ठिकाणीं आहेत, तेव्हां त्याचाउपदेश ऐकणें भाग आहे. बरें तर आता कारभार कोणाला द्यावा ?

**गोपाळराव** — त्याविषयीं श्रीमंतानीं काळजी करूंनये त्रिंबकमामा सारिखे कारभारी केल्यावर काम पहिल्यापेक्षां चागलें चालेल. त्यांस आज्ञा मात्र व्हावी.

**माधवराव**— माझाही विचार असाच आहे. मामानीं कारभार पाहवा. तसेंच तुह्मी, आपा, मल्हारराव, नाना, यानीं आपआपलीं कामें पाहवीं, न्यायखात्यात तर ( रामशास्त्र्याकडे बोट दाखवून ) प्रत्यक्ष हे तेजोरूपी न्यायमूर्तीच उभी आहे. मामा, तुह्मी आजपासून काम पाहण्यास आरंभ करा.

**त्रिंबकमामा**— आह्मास काय जसें सांगणें होईल तसें करायाचें; हे इतके आपले सेवक कामात असतां दादा रुसून गेले ह्मणून चिंतानाहीं. निजाम अली तर थैली मान्य करून परत निघून गेला. आपण-[illegible]राविषयीं कांहीं काळजी करूनये.

**माधवराव—** झालें तर, येवढ्याकरितां आज आपणां सर्वांना बोलाविलें होतें. असे सुंदर कारभारी मिळालि आता मी निसूर झालों. परवां रामशास्त्री बावाच ह्मणाले कीं, शरीरास जसे अवयव अथवा इमारतीस जसे खांब तसे राज्यास कारभारी आहेत. जर खांब बळकट असतील तर इमारत ही मजबूत राहील. जर अवयव सुदृढ असतील तर शरीर हीं निरोगी राहील.

**रामशास्त्री—** मला थोडी आज्ञा असावी. आह्मी सर्व शरीराचे अवयव खरे परंतु या अवयवाकडून चलनवलन करविणारा शरीरांत आत्मा ह्मणून एक असतो, ही उपमा आपल्याकडे येती. असो आतां आपल्या उपहारास उशीर होईल. ही पुनः मुत्पाकांतून वर्दी आली. चला मामा आतां सर्व व्यवस्था तुह्मास ठेवणें भाग आहे. द्या आज्ञा.

**सर्व—** आज्ञा व्हावी तर; हुकूम झाल्याप्रमाणें तजवीज करण्यास जातों.

**माधवराव—** ठीक आहे. मी हा चाललों. राज्य सुरक्षित चालून लोक सुखी राहोत ह्मणजे झालें. (सर्व निघून जातात.)

## प्रवेश २.

### रमाबाईचा आयनेमाहाल.

### माधवराव, व रमाबाई.

**रमाबाई—** ( पलंगावर निजली होती ती, लगबगीनें उठून) अगे बाई यावयाचें हें मला ठाऊकही नाहीं. मवा आपा फार घाईनें निघाले आणि ह्मणाले कीं आज फार जरूरीचें काम आहे. तेव्हां

लागले ह्मणून मी आपली निजल्यें होत्यें. झालें कां ! असें काय काम होतें.

**माधवराव**— होतें. तुह्माला काय सांगायाचें आहे. बायकांच्या तोंडांत गोष्ट राहत नसते.

**रमाबाई**— पुरे पुरे. कधीं बाहेर कांहीं बोललेलें ऐकिलें आहे कां उगच मेला जातां येतां टोला द्यावा. येथें कोठें राहतें आहे, आतां माझेपाशीं फुटेल पाहा. नाहीं खरेंच. थट्टेनें नाहीं ह्मणत. खरेंच काय झालें?

**माधवराव**— एकदा सांगितलें तर खरें. सरकारी कामांत बायकांना काय करायाचें आहे? आमचें राज्य आणि आह्मी हवें तें करूं. तुह्माला काय त्याचें?

**रमाबाई**— वः, बोलू नाहीं देणार. मी अर्धांगी आहें ह्मटलें, निम्मी सत्ता माझी आहे. मग नकोका मला पाहयाला. नाहीं खरेंच थट्टा नाहीं.

**माधवराव**— पाहिलें पाहिजे तर.

**रमाबाई**— मग नाहीं का सांगत; नाहीं तर नाहीं जा. मी जों जों ह्मणावें तों तों अधिकच.

**माधवराव**— बरें तर सांगतों; तुह्मी आज निजलांच होता. मी उठून बाहेर गेलों तों आपले दादा उभे. मी त्यांना कां ह्मणून विचारिलें मात्र, इतक्यांत आह्मी काम पाहत नाहीं ह्मणाले आणि चालते झाले. तेव्हां अर्थातच दुसरे कारभारी नेमून व्यवस्था ठेवणें भाग आलें; त्रिंबकमामास कारभार पाहयास सांगितलें. तसेंच गोपाळराव, शामराव, आपा, नाना, याना कामें सांगितलीं. शास्त्रीबावा ते तर आहेतच

**रमाबाई**— तरीच. मामजींशीं बोलणें झालें तें येथें ऐकिलेंच, परंतु हें पुढलें ठाऊक नव्हतें.

काय चमत्कार. आज आनंदी सासूबाई सकाळपासून आल्या नाहींत कीं बोलल्या नाहींत. मघाशीं मी कुंकू लावीत बसलें होतें आणि त्या अशा गेल्या. पण जशी कांहीं ओळख आहे कीं नाहीं. मी कोण आणि त्या कोण काय मेलें, आपणाला मात्र लोक नांवें ठेवतील, असें वाटतें. परवां मला भरजरीपैठणी आणली. त्याना वाईट वाटेल ह्मणून — सांगून दुसरी जेव्हा आणवून दिली तेव्हां मग मी नेसलें. तसेंच अहिल्याबाईकडून महेश्वराहून भेटीची वेणात गुंफायाला मोत्यें आलीं होतीं त्यांतलीं थोडीं त्यांच्या स्वाधीन केलीं तेव्हा मी घालूं लागलें. कसेंही करा संतोष नाहीं. असो, वडील आहेत ह्मणून शोभलें जातें. आह्मी केलें असतें ह्मणजे मग — कायग बाई पोरी या सगळ्या गांवभर डंका केला असता.

**माधवराव**— वडीलच आहेत. रागकेला तसाच लोभही करितील. परतु दादांनीं असें करावयाचें नव्हतें. ( डोळ्यात अश्रु आणून ) इतक्यांत त्यांणीं आमच्या तीर्थरूपाचे शेवटचे शब्द विसरावयाचे नव्हते. ( उसासा टाकून ) त्याचे ते शब्द माझ्या पुरे ध्यानांत आहेत. माझाहात धरून दादाच्या हातांत दिला आणि ह्मणाले; माधवा मी तर चाललों. आणखी एकदोन दिवसांत हें जग मला नाहींसें होईल. आतां एकाघटकेंत या संपत्तीचा, या ऐश्वर्याचा, या राज्याचा माझ्याशीं संबंध तुटेल. राज्य करीत असतां या पुण्याच्या लोकास सुखद्यावें ह्मणून मी पुष्कळ प्रयत्न केला; परतु त्या चाडाळ यवनाच्या चुरशीनें तें ... व्यर्थ गेलें. आतां माझ्या पाठीमागें तूं पेश...

तेव्हां लोकांस सुखीकरण्याचे प्रयत्नकर. दादांचें ऐकतजा. तुझें पोरवय आहे. दादा प्रौढ आहेत. आजपर्यंत शिकवणुकीची गोष्ट मी तुला सांगत आलों. आतामाझ्या ठिकाणींच दादाना समज — आणि दादांस ह्मणाले दादा माधवरास संभाळा. तुमच्या ओट्यात त्यासघ्या, त्याचें उणें पडू देऊ नका. तें आतां परदेशीं मूलझालें आहे. जातीनें तो गरीब आहे. दादा त्याला विसरूं नका. त्याला राज्यरीति शिकवा. त्याच्याकडून यवनास दंड करवा तुह्मी त्याचे तीर्थरूप व्हा. माझा नव्हे, आता तो तुमचा मुलगा आहे. फिरवा माझ्या डोळ्या समोर तुह्मी त्याच्या तोंडावरून हात फिरवा. तुह्मी परस्परावर प्रीतिकरितां हें पाहून मला मरूंद्या. अरेरे काय दारुण प्रसंगतो.— नकोबाळे नकोडोळ्यातून पाणीकाढूं भगवत् सत्तेपुढें ब्रह्मदेवाचाही उपाय नाहीं. मग आपणतर माणसें आहोंत. उगी ( धोतरानें तिचेडोळे पुसतो )

**रमाबाई—** इतकें झालें असतां मामजींनीं असें केलें. ह्मटलें ह्मणजे कोणावांचून कोणाचें अडतनाहीं, पण त्यांनीं असें करायाचें नव्हतें.

**माधवराव—** हो, अडतें कोणाचें, आई मेली तरी दाहा दिवसाच्या मुलाचें नाहीं अडत, मग हें तर काय; पण इतकेंच कीं दिसण्यात हें विरुद्ध दिसतें, त्यांणीं आह्मी एकविचारें असावें. एकचित्तानें राज्यकरावें यात उभयतास भूषण. परंतु नाहीं, तें यशघेणें आमच्यानशिबीं दिसत नाहीं. आता आपण तीर्थरूपांचे शब्द खरे करावे. माझी अशी फारइच्छा

आहे, कीं या पुण्यांत जिकडेतिकडे हास्यवदनें दृष्टीस पडावीं. कोणी एकी गृहस्थ आला असतां त्यास सर्व सुखी दिसावे; परंतु अधिक सुखीकोण? हा की हा हें ओळखितां येऊंनये.

**रमाबाई—** होगड्ये. मला देखील असेंच वाटतें. पलीकडे मारुती जवळून बायका पाण्याला जातअसल्या ह्मणजे मला असें वाटतें कीं त्या सगळ्याना माझ्यासारिखीं लुगडीं नेसवावीं, माझ्यासारिखे त्यांना दागिने घालावे, माझ्यावर जशीप्रीति आहे तशी त्यांच्यानवऱ्यांनीं त्यांच्यावर करावी. खरेंगड्ये काय असेल हें सदा असें वाटतें.

**माधवराव—** शाबास. राज्यास स्वामीण पाहिजे ती अशीच. नाहींतर आमच्या आनंदी- काकु. आहाहा ! काय सांगूं पण ! दादा जातीनें भाबडे आहेत. त्या पुरुषाच्या आंगीं वैर मुळचें ह्मणून नाहीं. परंतु करतोकाय ! सांपडला बाईच्या तडाक्यांत, गेलीबुद्धि फिरून. मी मोठा दैववान् कीं अशी सद्गुणी मुलगी माझ्यावांट्यास आली. असो आतां जातों.

( निघूनजातो )

**प्रवेश ३.**

देव घराच्या पुढील सोपा.

**रामशास्त्री—** अरे पांडोबा, श्रीमंतांची स्वारी कोठें आहे.

**पांडोबा—** स्नान करून देव घरांत बसले आहेत, जपास आरंभ झाला आहे. गांठ घ्यावयाची आहे?

**रामशास्त्री—** होय जा जाऊन विनंती कर.

**पांडोबा—** आज्ञा केली असती, परंत

ध्यान्ह झाल्या शिवाय कोणीही आले तरी गडबड करण्यास येऊं नका अशी ताकीद झाली आहे.

**रामशास्त्री**— अशी ताकीद झाली आहे! मध्यान्ह कालपर्यंत ! कायरे विठोबा कसें ?

**विठोबा**— जी साहेब. पांडोबा ह्मणतो असेंच, ती वेळ होईतोंपर्यंत आजकोणाचा आत रिगाव दिसत नाहीं.

**रामशास्त्री**— हंह, तर मग मी आतांजातों ब्रह्मकर्म आटपून बाहेर आले ह्मणजे, मी आलों होतों अशी सूचना करा. विसरूंनका ( निघून जातात )

## प्रवेश ४.

रामशास्त्र्याचा वाडा.

रामशास्त्री आणि त्याची पत्नी.

**पत्नी**— आज दिसण्यांत चित्त उदास दिसतें; काय कारण तें मला सांगितलें पाहिजे.

**रामशास्त्री**— उदास खरेंच; वाड्यांत गेलों होतों. तेथें श्रीमंत जप करीत बसले आहेत व दोनप्रहरपावेतों गांठ पडणार नाहीं; असें समजलें.

**पत्नी**— मग त्यांत वाईट तें काय ? स्नानसंध्या कां वाईट ! ( हसत्ये )

**रामशास्त्री**— वाईट ह्मणजे काही संशय की काय ? दोनदोन प्रहर स्नानसंध्येंत घालविल्या वर प्रजेचें रक्षण कसें होतें. इतरांची गोष्ट निराळी आणि श्रीमंताची गोष्ट निराळी आहे त्याचें मन फिरविण्यास आतां कांहीं युक्ति योजिली पाहिजे. स्वयंपाक सिद्ध असेल तर भोजन करून पुनःजातों.

जाऊन पाहर्ये.

( आंत जाऊन आल्यावर )

बाई तर स्वयंपाक आटपून केव्हांची हातजोडून बसली आहे. इकडूनच उशीर.

**रामशास्त्री—** शाबास, मी मघांपासून वाट पाहतों आहें. शेवटीं टपका आलावरच. ठीकठीक, हा उटलों ( निघून जातात )

## प्रवेश ५.

शनवार वाडा.

माधवराव व रामशास्त्री.

**माधवराव—** या शास्त्रीबावा ठीक आगमन झालें; आपली स्वारी प्रातःकाळीं आली होती परंतु जप करीत बसलों होतों त्यामुळें गांठ पडली नाहीं. ब्राह्मण कुलांत जन्म घेतला आहे त्याअर्थी त्याप्रमाणें कांहीं केलें पाहिजे. जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक नको ?

**शास्त्रीबावा—** तसेंच आह्मास ही सार्थक केलें पाहिजे योगसाधनाचे मार्ग फार उत्तम आहेत सर्व त्रिभुवन व्यापक आनंदरूपी, असाही असतां अहंकार मोहादिशत्रू करून बद्ध झाला जो परमात्मा त्याच्या मुक्तीची इच्छा आपल्याठायीं झाली आहे. येणें करून जीवात्म्याचें कल्याण होईल. मीही त्याच क्रमाचें अवलंबन करणार; परंतु तसें करण्यास हीं ऐहिक सुखें उपयोगीं नाहींत. सर्व संगाचा परित्याग करून सुक्षेत्रीं सावधान चित्तानें अधिष्ठित झालें पाहिजे. अतएव काशीक्षेत्रीं जावयाची योजना करून आपली आज्ञा घ्यावयास आलों आहें. आपली "

इच्छा आहे ह्मणून दुसरी विनती करितों कीं आपण ही भस्थान ठेऊन मज बरोबर येण्याचें करावें. काशी ह्मणजे केवळ प्रतिकैलास आहे. तेथें जान्हवीच्या पवित्र उदकाचें त्रिकाल स्नान करून जपजाप्य योगमार्ग व भगवंताच्या मंगल नामाचें स्तवन हेंच करण्यांत कालक्षेप करूं.

**माधवराव**— आपला भाव माझ्या लक्षांत पुरा आला नाहीं. परंतु साधारण असें वाटतें कीं जपजाप्य करित बसलों होतों त्यावर आपला रोख आहे.

**शास्त्री०**— माझ्या बोलण्यातील भाव इतकाच कीं, आत्मस्वरूप ओळखण्याची आपणास इच्छा झाली आहे. ही फार चागली. याजकरिता आपण मजबरोबर काशीस चलावें मी आपणाकडून योगमार्गाचें अध्ययन करवीन.

**माधवराव**— आतांतर उमजलोंच. मी पूर्वी बोललों तेंच. शास्त्रीबावा, आपण योग्य पुरुष आहां. आपली निस्पृहता पाहून माझें पूर्ण समाधान झालें. आतां आपलें वास्तविक ह्मणणें कळवा.

**रामशास्त्री**— श्रीमंताचा=

**माधराव**— मघांची थट्टानको. खरें तें सांगा, मी उपदेशास पात्र आहें.

**रामशास्त्री**— ( हसून ) श्रीमंतांची थट्टा करण्याची योग्यता माझी नाहीं. आपण जप करीत मध्यान्ह काल होईतोंपर्यंत जर बसलां तर प्रजेचें सरक्षण कसें होईल ? मुख्यानीं कारभार पाहणें सोडिलें ह्मणजे हाताखालील कामगार-अर्थातच आळशी होतात-असें झालें ह्मणजे गरीब गुरीबांची दाद कशानें

लागते ! आपण जप करीत दोनप्रहर पावेतों बसणार असें जेव्हां ऐकिलें तेव्हां तो जप सर्व अनिष्टाचें मूळसा मला भासला. आतां आपला मुख्य धर्म प्रजाप्रतिपालन हाच होय. तें जर सशास्त्र झालें तर त्यातच आपणास मुक्ति आहे. आपण त्याचें संकटापासून रक्षण करावें आणि त्यांणीं आपणासाठीं परमेश्वरापाशीं वर मागावें. असा परस्पर संबंध ज्याराज्यात राहातो, त्या राज्यास वैकुंठाचीच उपमा योग्य. यास अनेक शास्त्राधार आहेत. केवळ माझेंच ह्मणणें असा अर्थ नाहीं.

**माधव०**— मला शास्त्राधार आपणापुढें नकोत आपणच जागृत शास्त्रावतार आहां. शास्त्रीबावा आज मला आपण मोठ्या संकटातून बाहेर काढिलें. नाहींतर लोकांना थोड्याच दिवसात माझा कटाक्ष आला असता. कारभारी निस्पृही पाहिजेत ते येवढ्याकरिता.

**रामशा०** — माझ्या बोलण्याचा श्रीमंतास क्रोध आला नाहीं यावरूनच लोक आपल्या स्वभावाची तारीफ करितील. आता मला आज्ञा असावी.

**माधव०** — उत्तम. मला आणखी कांहींगोष्टी विचारावयाच्या आहेत. परतु आतां अवकाश दिसत नाहीं. दुसरी एकादी संधी लवकरच येवो.

**रामशा०** — मी आपला सेवक आहें. दर्शनास दर रोज येतच असतों.

( रामशास्त्री निघूनजातात. )

**माधवराव**— भलानिस्पृही ब्राह्मण. शाबास.

शास्त्रीबावास न्यायाधीश केल्यापासून मुलखांत आबादीझाली यांत नवल नाहीं. असलापुरुष विरळा. माझे सर्व स्तुत्य उद्देश आतां त्यांस कळवून त्यांचें अनुमोदन विचारितों. कोण आहेरे बाहेर — बहिरू— जयाजी—

जयाजी— जी सरकार, आज्ञा, हुजर हाय.

माधवराव— जयाजी रामशास्त्र्याकडे जा, आणि ह्मण कीं, रात्रीं मी बोलाविलें आहे.

जयाजी— आज्ञा सरकार ( निघून जातो )

( रात्रझाल्यानंतर )

## प्रवेश ६.

दिवाणखाना.

रामशास्त्री— ( दरवाज्यात ) कायरे ! कृष्णागायकोंड, श्रीमंतांची स्वारी आंत आहे कीं नाहीं ? शोधकरून येवरें, मी आलों आहे ह्मणून विनंती कर.

कृष्णाजी— जी, हुकुम. आव्या, आव्या, उठ उठ घे काठी.

( आवा जाऊन आल्यानंतर )

जी सरकार हुजूर स्वारीतर वाढोळ्ची येऊन बसलीया. अर्ज केला. आमदी हाटकलय.

( रामशास्त्री आतजातात )

माधवराव— ( ताजीमदेऊन ) नमोनमः यावें शास्त्री बावा. आपला येतों ह्मणून निरोप आल्यावर येथें येऊन बसलों.

रामशास्त्री— सेवकांस मान देण्याचा हा एक मार्ग आहे. नाहींतर आमचा निरोप गेल्याबरोबर ...प यावें ही आमची कोठली योग्यता ? न्यायधनें

चाकरास अहो ह्मटलें, ह्मणजे सर्व अहो ह्मणतात.

**माधवराव**— असा शास्त्रीबावा हा लोड.

**रामशास्त्री**— आज्ञा.

**माधवराव**— बोलावूं पाठवण्याचें कारण असें कीं, लोकास सुखावह होतील अशा कांहीं गोष्टी करण्याचा आपण आपल्याकडून पाया घालावा, असें वारंवार मनांत येतें याविषयीं आपली सल्ला विचारावी. असा आजमाझा कितीक दिवसांचा विचार आहे. परंतु वानर ह्मणतें पाहाट झाली ह्मणजे घरबांधूं तशीगत झाली. एवढ्या करितां जासूद पाठविला. आपलें मत कसें आहे ?

**रामशास्त्री**— प्रजापालकाचा हा धर्मच आहे, कीं त्यांणीं सदैव लोक कल्याणार्थ युक्तिप्रयुक्ति जडवाव्या. आह्मा कडून राजधर्माचें अध्ययन करवीत असतां आमचे आचार्य वारंवार ह्मणत कीं प्रजेस सौख्य व्हावें, एतद्विषयीं जो दक्ष तो राजलक्ष्मीपासून आपण किंचितही शोभा न पावता उलटी तीस शोभा आणतो. भगवतानें आपणास लोकाच्या दुःखाचा परिहार करण्याची इच्छा दिली, हें पाहून मला वास्तविक आनंद होतो. भूतदया, हा सर्वांसच श्रेष्ठ धर्म आहे. सत्पुरुषाचें असेंच लक्षण.

॥ निर्गुणेष्वपिसत्वेषुदयांकुर्वंतिसाधवः ॥

॥ नहिसंहरतेज्योत्स्नाचद्रश्चांडालवेश्मनि ॥

तेंच पृथ्वी पतींनीं आपण केलें पाहिजे. मलाही कांहीं सूचना करावयाच्या होत्या ती आयतीच संधी आली. लोकोपयोगीं गोष्टींत दोन तऱ्हा पाळिल्या पाहिजेत. ( १ ) सांप्रत जी अव्यवस्था असेल ती

उपटून टाकिली पाहिजे (२) व दुसऱ्या नव्या उपयुक्त गोष्टी उत्पन्न केल्या पाहिजेत.

**माधवराव—** आपण एकदोन सांगा माझ्यापेक्षां आपणास अनुभव फार आहे.

**रामशास्त्री —** आश्रितांशीं इतक्या नम्रतेनें वागणारे भूपती थोडेच असतील. या न्यायाच्या कामांत धर्मशास्त्रा अन्वयें न्यायतर चालतच आहे, परंतु कित्येक असे खटले उभे राहतात कीं त्यांचा निर्णय व्हावा, एतदर्थ अवांतर ही अनेक विचार पाहणें भाग येतें. याकरितां कांहीं पंचायती ठरवाव्या आणि ते ठराव प्रत्येक ठाणेदारांकडे पाठवावे. त्यांणीं त्यांच्या अनुलक्षेंकरून न्याय निवाडे करावे. या कृत्यास आरंभ करण्यास आज्ञा होईल, तर मी करीन. मात्र, आपण माझें साहित्य करण्यास नारायणशास्त्री पटवर्धन, कृष्णशास्त्री परांजपे, जनार्दनशास्त्री अठले, माहादेवशास्त्री आगाशे, आणि त्रिंबकशास्त्री आपटे, यांस द्यावें.

**माधवराव—** उत्तम आहे. असें केल्यापासून प्रजेचें चांगलें संरक्षण होईल खरें. शिवाय आपण ह्मणतां अशी मंडळी नेमल्यावर काम तडीस जाईलच जाईल.

**रामशास्त्री —** यामंडळींत आपण मुख्य स्थानीं येऊन बसलें पाहिजे.

**माधवराव—** अतिउत्तम. अग्निहोत्र्याचा होम टळेल, परंतु माझा हा नेम टळणार नाहीं.

**रामशास्त्री—** दुसरी अशी सूचना आहे कीं, पतची लढाई झाल्या दिवसापासून तेथें पराभव

झाला ह्मणून आपल्या राज्यांत रहणाऱ्या मुसलमानां-
स कित्येक कामगार त्रास देतात. याविषयीं बंदोबस्त
झाला पाहिजे. त्यांचे बंधुजन इराणी, दुराणी, अफगा-
णी यांणीं जरी उन्मत्त होऊन सदाशिव रावाचा परा-
जय केला, तरी आपल्या राज्यांत जे राहत होते त्यां-
णीं आपणाविरुद्ध बोट देखील उचललें नाहीं. त्यां-
णीं या सुख समुद्रांतील लाटांचा, या राज्यरीतीचा पुरा
अनुभव घेतला होता. त्यापासून झालेले फायदे पुरे स-
मजून ते राजनीतींत किमपि कमी नव्हते. शांत समुद्रांत
बळकट नांगरलेलें गलबत तरी कांहीं हालतें परंतु त्यां-
चीं मनें अगदीं अस्थिर झालीं नाहींत. आपल्या सै-
न्यातून सुद्धा ते लढत होते. असें असता त्यांचा छळ
कोणत्या कारणानें करावा ?

माधवराव— पानपत ! पानपत ! ( उसासा टा-
कून ) मराठ्याचा पराजय ! असो, परंतु शास्त्रीबावा
ही गोष्ट माझ्या कानीं आली नव्हती. हिंदु काय,
मुसलमान काय, अठरा पगड जातीचे लोक जे कोणी
आमच्या आज्ञा नीट मानून स्वस्थ आहेत त्यांस मी
आपल्या पोटच्या लेंकरासारिखे मानितों. त्यांना
कोणी ही इजा दिली तत्रापि माझ्या मानाचें खंडण
होतें, यास्तव आज्ञापत्रें लिहून शिक्का मोर्तब करावयास
आणा. त्यात असें लिहा ( रामशास्त्री टिपतात ) " आ-
ज्ञाकरण्यांत येते ऐसाजे आमच्याकानीं अशी फिर्याद
आली आहे कीं न्याय पंचायती करण्यास त्याना आह्मी
मुखत्यारकेले त्यांतून कित्येक, यवन वगैरे नीच जाती-
च्या लोकांस आमच्या हुकुमाविरुद्ध उगीच त्रासदेतात.
ऐशीयास आजतागाइत पासून आमच्या राज्या

कोणत्याही भागातून, कोणत्याही वर्णाकडून कोणत्याही कामगारा विरुद्ध कांहीं तक्षिरीची वाजवी फिर्याद आल्यास त्या कामगारास त्याच्या गैरवर्तणुकी बर हुकुम सजा दिली जाईल. माहार, माग, चांभार, धेड, मुसलमान हे जरी जातीनें हलके आहेत तरी आपआपल्या धर्मानें जोंपर्यंत चालतात तोंपर्यंत आमच्या मेहरबानगीचें सुख त्यांणीं भोगावें. हें रास्त आहे. सर्वांस मश्हूर व्हावें." या आज्ञापत्रा करितां शास्त्रीबावा मजपेक्षां आपले आभार सर्वांनीं अधिक मानावे. याचें उत्पत्तिस्थान आपण. मी उगाच कारण.

**शास्त्रीबावा**— लोकांच्या आशीर्वादांचा वर्षाव, आपणावर होवो ह्मणजे झालें.

**माधवराव**— सर्वांत मोठी गोष्ट ती करणें राहिलेंच. या साल आरंभीं तालुके फिरावयास गेलों होतों तेव्हां एक महा अनाचार दृष्टीस पडला. श्रीमंत लोक आपल्या सत्तेच्या बलेंकरून गरीब बिचाऱ्या दरिद्री कुणब्यास हवें तेव्हां वेठीस धरून पैसा दिल्याशिवाय पाहिजे तितके लांब नेतात— त्याच्या बायका पोरांची काय दुर्दशा उडत असेल— असें दिसल्यावरून तेव्हांच मी जिकडेतिकडे ही चाल बंद पाडावी ह्मणून सांगितलें; आणि येथें आल्यानंतर लेखी हुकूम पाठविणार होतों तें तसेंच राहिलें.

**रामशास्त्री**— तरीच एकून आपण पूर्वीं अशी आज्ञा केली होती. लेखी जरी नसली तरी कामगारास ती मानणें भाग आहे. आतां नीट समजलों. काल वसई महालांतून अर्ज घेऊन लोक आले आहेत. ... सुभेदार बिसाजीपंत आण्णा यांणीं त्या हुकुमा-

विरुद्ध आचरण केलें. त्यांणी धरलेले बिगारी येथें आले आहेत आपण आज्ञा केलेली मला ठाऊक नव्हती ह्मणून मी थोडा विचारांत होतों. परंतु आतां विसाजीपंतानीं मोठा गुन्हा केला हें उघड आहे. त्यांस शिक्षा करणें ती श्रीमंतांनीच स्वतः येऊन करावी.

**माधवराव—** विसाजीपंतानें बिगारी धरिले? आणि तेंही माझ्या आज्ञेविरुद्ध! आपण उद्यां प्रथम परवाने तयार करून मोर्तबास पाठवा. मग दुसरें काम. त्या परवान्यांत साफ ल्याहावें कीं जबरीनें बिगारी धरिल्यास फार मोठी सजा दिली जाईल. विसाजीपंतानें बिगाऱ्यांकडून जें सामान नेवविलें त्या सर्वांची जप्ती करून लिलांव करून टाका. जो पैसा येईल त्यांतून बिगाऱ्यांची वाजवी दस्तुरी देऊन शिवाय त्या गरिबास नुकसानीबद्दल योग्य बक्षिसें द्या. बाकी उरेल तें तूर्त अमानत खात्यांत पडूं द्या. विसाजीपंतास तर कामांतून मडकूब करा. असे दुष्ट लोक चाकरीत ठेऊन उपयोग नाहीं.

**रामशास्त्री—** एकदा त्यास क्षमा असावी.

**माधवराव—** नाहीं, न्यायाधीशा, या कामांत मी आपलेंही ऐकणार नाहीं. रास्त आज्ञा मोडणें ह्मणजे काय आहे हें विसाजीपंतास व सर्वांस कळलें पाहिजे.

( घड्याळावरील माणूस येतो )

**घड्याळावरील—** तेरा घटका रात झाली या चवदा घटीचा अंबल हाय, माहराज.

**रामशास्त्री—** श्रीमंतांस मी फार वेळ खोळंबविलें. आतां आज्ञा असावी.

**माधवराव—** बरें आहे; आपल्याशीं बोलत असता दिवसाचा तास आणि तासाचें पळ होतें.

( निघोन जातात. )

## अंक ४ प्रवेश १.

बुधवार पेठ—गटारयंत्र.

**रामभट—** काय, शितारामभट, इकडे या इकडे या, आज कुठे टिळा लाविला ? तुमचा तर, बाबा, एक दिवस रिकामा नाहीं जात. आमचीं कपाळें पाहा सदा पाढरीं. आज कुठे शक्करभात झोडला.

**शितारामभट—** छे कुठला शक्करभात घेऊन बसला; रामभट ? अहो तें तुह्माला. आज गणेशपत चाभारगोंदेकराच्या बापाचें श्राद्ध होतें. अँ. साधे गोळे होते नी काय— एकीकडून शिधा यावयाचा आहे तिकडे आता निघालों आहें.

**रामभट—** ( धोतर ओढून ) याहो. शिधा येईल पुढें. अरे नारायणभट, हा चालला धर.

**नारायणभट—** कुठे चाललासरे, शितारामभट ? रामभट, हा धरला.

**रामभट—** वेडा, गांवांत काय बातमी चालली आहे, नी हा चालला शिधा आणायाला !

**शितारामभट—** गावांत काय चाललें आहे ? तर मग बसतों गड्या. कायरे रामभट, गावात काय चाललें आहे ?

**नारायणभट—** हा वेड्या, तुला का हींच कानाहीं ठाऊक ! ( याला, काय पाहून शिधा देतात रे ? ) गांवांत श्रीमंताचे आज्ञेवरून फडेकोटतयारी चालली आ-

खालीं हैदरअली ह्मणून कोणी आहे. त्याच्या-

वर स्वारी होणार. शिंदे, होळकर, गायकवाड, यांना आज्ञापत्रें गेलीं आहेत. आतां कायरे थाट ! येथून तेथून चोहों बाजूंस लश्करांचीं लश्करें उतरतील.

**रामभट—** अरे उतरतील काय ? येऊन उतरलीं.

**विदूषक—** ( मध्येंच ) तुमचें आतां फार उत्तम झालें. कोणाचे बाप मरतील, कोणाचे लेक मरतील, तितकीं तुमचीं श्राद्धें वाढलीं.

**रामभट—** मूर्ख बेटा काय बोलतो पाहा.

**विदूषक—** बोलतो बरोबरच. मग काय, रामभट लागले सांगायाला, करा, बापाय तरपंते, मुलाय तरपंते, दक्षणाय टाकंते.

**नारायणभट—** तरपंते, तरपंते ठीक ! ही व्यक्ति कोठून आली हो येथें ?

**शितारामभट—** कोठून आली कोण जाणे व्यक्ति पण व्यक्ति आहे.

**रामभट—** जाऊ द्या कीं. तो बडबड्या आहे. अहो, बरी आठवण झाली. भास्करपंत स्मार्त कांहीं अनुष्ठानें बसविणार आहेत. त्यांणीं मला ब्राह्मण आणायास सांगितलें होतें. चला तुह्माला नेतों. तेथेंही ही बातमी लागेल.

**विदूषक —** महाराजा, रामभट महाराजा, आह्मी येक ब्राह्मण आहे. मोठे विद्वान्. आपल्यापाशीं आले आहे. गांवीं आमचा बायको मेले. मूल मुसलमान झाले. घर जळून गेले. तेथून देश त्याग करून येथें आले. सोय झाली तर मोठा पुण्य लागेल. आह्मी येतो.

**रामभट—** अहो तुह्मी कोण ? आताच

त्यासारिखे बोलत होतां. आतां लागलेच तेलंग्या सारिखे बोलता. तुमचें नांव, गांव, गोत्र सांगा. तुह्मालाही नेऊ. ब्राह्मणाची परस्पर सोय झाली तर त्यांत आमचें काय जातें ?

**विदूषक—** माझें नाव शामबक्ष. माझें गांव महमदपुरी, माझें गोत्र रामभट.

**रामभट—** कोणरे तूं लुच्चा, अशी थट्टा करायास येथें आलास कायरे ? चरमी जोडा घेतला आहे काल. योग्यता पाहावी आणि बोलावें. वाळींत टाकून, शेणमार करून घालवून देईन ठाऊक नाहीं ?

**विदूषक—**नकोरे बाबा मला शेणमार. शेणमाराची भीति नाहीं फारशी, पण दुसऱ्यानें आंघोळ करावी लागेल याची भीति. आताशीं आठआठ दिवसांनीं स्नान करायाचा बेत धरला आहे. मी आपला पळून जातों कसा. नको तो मला शेणमार.

( विदूषकजातो )

**सर्व—** काय विजातीय मूर्ति आली होती ही ! असो आपल्याला काय त्याशीं करायाचें आहे ? चला लवकर जाऊं.

( निघोनजातात. )

## प्रवेश २.

शनवार वाड्यातील हुजुर कचेरी.

माधवरावसाहेब पेशवे, त्रिंबकमामा, गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव रास्ते, आपाबळवंत, नानाफडनीस, रघुनाथराव, सखारामपंत, माहादाजीशिंदे, तुकोजी होळकर, जयाजी गायकवाड, आणि पेशव्यांच्या पदरचे पुष्कळ सरदार.

( दरबार भरल्यावर )

**माधवराव—** मामा, दरबार भरविण्याचें या सरदारांस कारण सांगा.

**त्रिंबकमामा—** जी, ( सरदारांस ) सरदार मंडळीस मराठी बाण्याचें शौर्य दाखविण्यास आतां उत्तम प्रसंग आला आहे. कर्नाटकांत हैदरअल्लीनें फार नासाडी मांडिली आहे. कोणी वलंदेजी लोक त्यास साहाय्य असल्यामुळें तो आपला अपमान करण्यास उद्युक्त झाला आहे. त्याच्या सरहद्दीनजीकचे जे आपले पाळेगार त्यांस त्यापासून बहुत त्रास होतो. तेव्हां जर आपणास आपलें नांव राखणें असेल, जर यवनाची सत्ता चालूं न देणें असेल, तर या वेळेस सैन्याची तयारी करून कर्नाटकांत जावें हें ठीक. ज्या पाळेगारांनीं आपणास मराठ्यांचे व पेशव्यांचे अंकीत ह्मणविलें आहे त्यांच्या संरक्षणार्थ हरतऱ्हा केल्या पाहिजेत. आह्मी त्यांजपासून करभार घेतों. कांहीं कारण लागल्यास त्यांस हुकूम करितों. आह्मी त्यांचे यजमान ह्मणवितों. मग त्यांजपासून फायदा करून घेण्यास जर आह्मी अधिकारी आहों तर संकट समयीं त्यांस साहित्य करण्यासही अधिकारी झालें पाहिजे. शिंदे, होळकर, गायकवाड, रास्ते, यांच्या सारिखे शूर महापराक्रमी सरदार मराठ्यांचे आहेत. असें असतां या हैदरअल्लीस आह्मास त्रास देण्यास धैर्य आलें हेंच नवल. ज्या प्रमाणें जवळ दाहापांच लहान लहान लेंकरें हासत आनंद करीत बसलीं असतां बाप अधिक शोभतो त्याचप्रमाणें पुष्कळ पाळेगार व अंकीत असल्यानें राजा शोभतो. या गोष्टीचा पूर्ण विचार

वयासाठीं आज श्रीमंतांनीं हें दरबार भरविलें आहे.

**रघुनाथराव**— त्यास खंडणी देऊन त्याचें शांतवन केलें तर ?

**माहादाजीशिंदे**— काय दादासाब खडनी ! त्या हायदराला ! या येळस माज्या आगाचा तिळपापड जालाया. हब्ये बोलन आपल्यास्नीच सोबो. ( माधवरावास ) सायब, जोहार करतो. या चाकर मान्याला आज्ञा व्हावी. त्यो मुसलमान माज्या डोक्यातपुरी पासून सलतोया. ह्योपरानी (छातीवर हात ठेवून )जिवंत हाय त्योपर्यंत त्येचा मुड उगवीन. दादासाब-आपन इसरला. हिंदुस्थानांतील म्होइम आपन इसरला. तित माजा बदु पडला. ह्यो माजापाय तित तुटून पडला. तित पडलेल्या रक्ताच्यान मी त्या मुसलमानावर म्होइम करीन. आज्ञा मातर व्हावी. सायब आपल्या पायाच्या पुन्यान त्येचा जाऊन समाचार घेतो. त्येला पायाजवळ धरून आनतों. आता आतां मुसलमानानी लइ पुडावा मांडलाया. माजा राग माज्या मदी मात नाहीं. दादासाब आपून पुना खड असा सब्द उच्चारूनये.

**त्रिंबकमामा**— दादासाहेबाचा रोंख मी उमजलों. श्रीमंताचे नातलग पडले म्हणून कमजास्त बोलतां येत नाहीं. परंतु या पुरुषापासून खास मराठी राज्याची हानि होणार. दादासाहेब, आपण व आपले पुत्र अशा गोष्टीनें लोकाचे आपांसमात्र कारण व्हाल. मी बोललों याची मला आपण व श्रीमंतांनीही माफी केली पाहिजे. मी कारभार पाहतों म्हणून मला असें बोलणें भाग आलें, मी पुनः माफी मागतों.

**माधवराव**— ( उभयतांस) कलह करण्यास

ही सधी फार उत्तम पाहिली. आपण असे आपआप सांत भाडूं लागलों ह्मणजे हैदरास जिंकू यांत संशय नकोच. तुकोजीहोळकर आतां तुह्मी बोला.

तुकोजीहोळकर— सायब मी तर ही तलवार लटकावूनशनी आलो हाय, आज्ञा मातर व्हावी. ही उपसूनशनी इचा पराक्रम करून दावतों. मला सरकार, ह्मंय्ये ठाउक न्हायी, येक शिपाइ बाना मातर मी जानतों. आपल्या आन मातोसरी आइल्याबाइच्या पुन्यान ह्मोइम फते करून येतों. हयदर मराठीराज्यांत येऊनशनी दगा करतो, मर्जीकाय. मला हुकूम व्हाव-दरकार काय त्येची येन्याची फुडे. सायेब माजा आ-रज इक्ताच.

मल्हाररावरास्ते— माझी विनंती ऐकावी. म-राठे यश पावतील किंवा नाहीं हें आताच समजून आलें. महादाजीशिंदे व तुकोजीहोळकर असे असे शूर सर-दार जेथें मी मी ह्मणून जाण्यास अर्ज करितात तेथें आमचीं निशाणें विजयी होऊन हैदरअलीच्या मस्तकावर नाचतील यांत काय संशय? पानपतच्या लढाई खेरीज (ईश्वरेच्छेनें तें कसें झालें असेलतें अ-सो) त्या लढाई खेरीज आह्मास पराजयाची वार्ता एके ठिकाणीं तरी ठाऊक आहे काय? श्रीरंगपट्टणा-चा खंड कोणीं घेतला? खडापा जवळ खर्पा व कर्नोळा या दोघा नबाबांचा पराजय कोणी केला? बाहादुर गड कोणी घेतला? निजामअलीचें मोर्तब कोणी घेतलें? तेच हे मराठे शिवाय याच हैदरअलीच पराजय केलानाहीं की काय? श्रीमतांनीं आपणस्वतः स्वारीकरून खडणी आणलेली आह्मी अजून [illegible]

लों नाहीं. तो हैदर ही विसरला नसेल. त्याच्या अंगावर शिंदे अथवा होळकर असे प्रतापी सिंव्ह कशाला पाहिजेत ? उत्तरेस हिंदुस्थानांत कित्येक उन्मत्तहत्तीसारखे दंगा करू पाहतात, तिकडे त्यांणी आपली चाल करावी. हैदर काय कपटी लांडगा आहे मी त्याचे पाठीस लागतों. कोणीकडे कसा पळतो तें पाहतों. शेतकरीबावांचा बडगा जों पर्यंत दृष्टीस पडला नाहीं तों पर्यंत शेताचीनासाडी करील. मला आज्ञा व्हावी. ती झाली कीं मी निघालोंच.

**माधवराव**— शाबास, महाविरानो शाबास. मराठी राज्याच्या संरक्षणाची भीति आता कशास पाहिजे ? ही लढाई आह्मी उकरून काढली नाहीं. लढायांमध्यें अनेक लोकांचा संहार होतो, हें आह्मास पूर्णपणीं ठाऊक आहे परंतु उपाय नाहीं. आमच्या वर जेव्हां त्याणें आपण होऊन प्रसंग आणला तेव्हां आपलें नांव राखण्यासाठीं लढाई करणें भाग आलें आहे. तुमचीही राज्यसंरक्षणार्थ उत्सुकता पाहून धन्य मराठे असें आमचे शत्रुही ह्मणतील. महादाजी आणि तुकाजी आपण वर हिंदुस्थानांत शांतता राखण्यास जावें. आणि त्रिंबकमामा व मल्हारराव यांस घेऊन मी स्वतः हैदरावर जातों. पानपतच्या लढाई पासून मराठ्यांची शक्ति क्षीण होत चालली असें निंदक ह्मणोत. आमचा तर विजयध्वज हे सरदार ( सर्वांकडे बोट दाखवून ) अधिकाधिक उंच उभारता हेत. मामा, याप्रमाणें तजवीज व्हावयाची. बंदोबस्त करावयास जिकडे तिकडे हुकूम द्या. कां सर्वांचे पसंत आलाना ?

**सर्व**— सर्वांचे पसंतीस आला, परंतु आपण जा-वयाचें करूं नये. आपली स्वारी येथेंच असावी ह्मण-जे ठीक.

**माधवराव**— नाहीं. आतां तेवढी गोष्ट बो-लू नका. बेत झाला तो झाला. आपण आतां आपआप-ल्या तुकड्यांत जावें हें नीट आहे— कोण आ-हे— कारखानीस,—

**कारखानीस**— आज्ञा सरकार. ( पान सुपारी वांटतो आणि नंतर सभा बरखास्त होत्ये. )

## प्रवेश २.

( आतला चौक )

रमाबाई, राधाबाई, सरस्वतिबाई, लक्ष्मीबाई.

**राधाबाई**— बाईसाहेब आज आपण अशा चिं-तेंत काबरें दिसता?

**रमाबाई**— कोण मी? नाहींगबाई चिंता कसली?

**सरस्वतिबाई**— तें नका गडे बोलू. तोंड उतर-ल्यासारखें दिसतें.

**लक्ष्मीबाई**— बाईसाहेब आतां नका लपवूं? सां-गाच,सुकलेली गुलाबाची कळी जशी दिसत्ये तशा आज आपण दिसतां. अशी फिक्कट मुद्रा आह्मी कधींच पा-हिली नव्हती.

**रमाबाई**— खरें ह्मणाल तर माझ्या बाई जिवावर धोंडा आला आहे. स्वारी करायाला ह्मैसुराकडे जायाचें आहे. काय करूं, काल रात्रीं सांगूनसांगून दमल्यें. पण नाहीं, मनांत भरलें तें भरलें. मामा जाताहेत. मल्हारराव जाताहेत. मग आणखी आपण कशाला बरें गेलें पा-हिजे? खोकला बळकट झाला आहे. पण [illegible]

नाव तें ऐकायाचें नाहीं. कायकरावें बाई, असा हट्टी स्वभाव. मकृतीला जपणें ह्मणून ठाउकच नाहीं जेव्हां तेव्हा ह्मणायाचें कीं राज्याचें चागलें तें माझें चागलें. शरिराला काय करायाचें आहे ? असें ह्मटल्यानें बाई कुठे होतें ? वास्तवीक ह्मणाल तर या काळजींत मी आहे.

**राधाबाई—** खरेंच. आमच्या येथें ह्मणायाचें कीं श्रीमंतच जाणार. शरिराला समाधान नाहीं, मग कशाला जावें बरें ? पण बाईसाहेब आपण सुखीबाई. आपल्यासारखें दैव कोणाचें ही नसेल. काय एक रत्न सापडलें आहे. मागल्याजन्मीं हरताळका चांगल्या पुजल्या आपण.

**रमाबाई—** होयबाई. काय त्या स्वभावाचें वर्णनच करिता येत नाहीं. लोकाचें मन दुखिवणें तर ठाउकच नाहीं. मी हट्ट घेतला ह्मणजे झालेंच काम. आता बाई मला कसें करमेल कोणजाणें.

**लक्ष्मीबाई—** इतकें हातांत आहेतना ? मुठीत अगदीं ?

**सरस्वतिबाई—** मुठींत ह्मणजे ? बाई थोरांचें असेंच आहे; घांस घेणें झालें तर अगोदर बायकोची परवानगी पाहिजे. कांग घेउ ? पाणीप्यायाचें झालें तरी कांग पिउं ? मग प्यायाचें.

**राधाबाई—** तालिवारांच्या चालीच त्या.

**रमाबाई—** पुरेग तुमचें मेलें कौतुक, ही कां थट्टेची वेळ आहे?

**लक्ष्मीबाई—** आह्मीका यट्टा करितों. खरें ...हे तें सागितलें.

( दासी आंतयेत्ये )

**रखमाईदासी—** बाईसाहेब, श्रीमंत मंदिरांत वाट पाहताहेत.

**राधाबाई—** ब्या बाईसाहेब सत्यच.

**रमाबाई—** ( हांसून ) अगबाई मला सांगितलें होतें खरें. बायानों अतां मी तिकडे जात्यें. माझ्या ही जिवाला स्वस्थ नाहीं.

( रमाबाईजात्ये )

**सरस्वतिबाई—** असा जोडा कोठें पाहिला न- व्हता. काय बाई त्यांची एकमेकावर जी प्रीति आहे ती कांहीं अतोनात. श्रीमत खोकले कीं बाईसाहेबां- चा जीव घाबरला. बाईसाहेबांना कोठें शिंक आली कीं लागले श्रीमत आंत बाहेर खेपा घालायाला. आ- ले पाच चार वैद्य

**राधाबाई—** नाहींतर तुमचें आमचें. मेलें दिव- सभर काम करकर करावें, आणि मग रात्रीं तरी गोड बोलणें आहेका ? तेव्हांही एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचें उत्तरेस.

**लक्ष्मीबाई—** खरंचगडे. आह्मीच काय पापके- लें होतें कोण जाणें. आठवड्यांतून साहा दिवस तर आमचे मेले संतापात आणि रागांत जातात.

**राधाबाई—** ह्मणूनच चला आतां घरीं जाऊ. आज आमचा गोडीचा दिवस आहे.

( निघोन जातात )

## प्रवेश ४.

रमाबाईचा शयनेमाहाल.

रमाबाई व माधवराव.

**माधवराव—** कां महाराज, देतांना आतां रजा? फार दिवस नकोत. महिन्याच्या आंत येथें पुनः या मंदिरांत बसायाला तयार.

**रमाबाई—** रजा काय द्यायाची. पण माझें गडे येवढें ऐकायाचें होतें, कांहीं गेलेंच पाहिजे असें नाहीं. खोकला झाला आहे, प्रकृत बिघडली आहे, पणबाई बोलावें कोणीं.

**माधवराव—** तुह्मी. प्रकृतीचें असो, पण मी तुह्माला सोडून उगीच दुसरीकडे जायाचें ह्मणून जाईन? गादीवर बसायाला पाहिजे आणि मग लढाईत शिरायाला कानकों? जाणें भाग आहे ह्मणून जातों. लोकांनीं आतां जर मजकडे पाहूं नये तर कोणाकडे पाहावें बरें. तुह्मीच पाहा.

**रमाबाई—** ह्मणून काय झालें? गेलेंच पाहिजे असें नाहीं काहीं. आतां वाटेनें काय? कोणी बोलणारें नाहीं काहीं नाहीं. गारपाण्याचीं स्नानें होतील. सकाळच्या प्रहरीं फराळ व्हायाचा नाहीं. पाहा बरें सांगून ठेवलें आहे. नकोबाई मी तरी येन्यें बरोबर.

**माधवराव—** ठीकठीक, मग फार उत्तम सोय.

**रमाबाई—** जळलें मेलें हेंच तें. मी ह्मटलेलें मनासनाहींच यायिचें. असल्यें मी बरोबर ह्मणून काय होतें?

**माधवराव—** व्हायाचें काय ? एवढ्याकरितां नेत नाहीं; मागें व्यवस्था पाहण्यास कोण ?

**रमाबाई—** पुरेपुरे लाडीगोडीचें बोलणें.

**माधवराव—** बरें तसें कां होईना. लाडीगोडी के-
ली पाहिजे. बायकाच्या रागांना देव देखील भ्याले

मग आमची ती काय कथा. लाडी गोडी केली नाहीं तर होतें कसें ?

रमाबाई— माणसानें काय बोलावें बाई आतां ?

माधवराव— बरें आहे, जा ह्मणून बोलावें. दुसरें काय बोलायाचें आहे ?

रमाबाई— जा तर जा. तर काय आणखी. माझें कधीं एकदां तरी ऐकिलें आहेका ? मी मेली उगीच वेडी ह्मणून हट्ट घेत्यें.

माधवराव— आमचें काम झालें. रजा मिळाली पण मागें व्यवस्था मात्र नीट ठेवा. मी तुह्माला शिकवावें असें नाहीं. तुह्मीच मला शिकवाल पण आपलें सांगून ठेवतों. आपल्याला सर्व जें कांहीं करणं आहे तें लोकांकरितां. त्यांना जर सुख होत नाहीं तर आह्मी कशाला ? आह्माला काय जन्मतांच देवानें मोठेपणाचा शिक्का मारला आहे ? आह्माला काय दोन तोंडें आहेत ? का दोन नाकें आहेत, का दोनशिंगें आहेत ? त्यांणीं मोठेपणा दिला ह्मणून आह्मी मोठे. भगवान् रामचंद्र देखील ह्मणाले कीं मी लोकांकरितां अवतार घेतला. पाहू बरें कशी व्यवस्था ठेवितात ती.

रमाबाई— मी हावी तशी ठेवीन जा. राहायाचें तर नाहींना ?

माधवराव— रामशास्त्रीबावा आहेतच. कांहीं मोठें काम करणें झालें तर त्यांस विचारीत जा ह्मणजे झालें.

रमाबाई— पण परत येणें कधीं होईल. मक्तीला बाई फार जपलें पाहिजे.

माधवराव— होहो. मक्तिमक्ति ह्मणजे

एक बाऊच केला आहे. काय करावें. मी सुखानें का-तुह्माला सोडितों. मला तर सोडून जाऊं नये असेंच वाटतें, परंतु निरुपायाची गोष्ट. या तोंडाकडे पाहिलें ह्मणजेच चित्त रमण होतें. रमा खरीच.

**रमाबाई**—अग बाई ताळच सोडला.

**माधवराव**— बर तर आता जातों, पण अ-गोदर एक साखरेचा—

**रमाबाई**— काय हें वेड लागलें. साखरेचा! बोलायाला तरी कांहीं वाटतें ?

**माधवराव**— वाटायाचें काय, येतों.

( मुका घेऊन माधवराव जातो )

**रमाबाई**— ( आपल्याशीच ) हे करवीरचे अंबा-बाई, कुलस्वामिणी, तुझी नाक डुरई काढीन. तुझ्या नावानें सहस्रभोजन घालीन. जय होवो, मकृति न बिघडो. मला आज अनुकूळ आहे. हे तुळजापुरचे आई तुझ्या यात्रेला ओहोराने येईन. जय आई पर्वती संभाळ तू आतां तूच आमची आहेस· कोणी बाहेर आहे का गेदासी ?

**दासी**— काय बाईसाहेब ?

**रमाबाई**— देवडीवरून जासूद पाठवून शास्त्रीबा-वांकडे सागून पाठीव कीं पर्वतीवर अनुष्ठानें बसवायास मी सांगितलें आहे. तसेंच ह्मणावें सप्तशतीच्या पाठासाठीं ब्राह्मण बसवा.

**दासी**— आज्ञा महाराज

( निघून जात्ये )

## प्रवेश ५.

**रस्ता**— जनार्दनपंत व कृष्णाजीपंत.

**जनार्दनपंत**— नमस्कार कृष्णाजीपंत. कशी काय बातमी? लढाईची काय बातमी आली आहे?

**कृष्णाजीपंत**— लढाईची बातमी काय. श्रीमंतच गेले होते तेथें काय पुसावें? जशी राज्यकारभारात दक्षता तशीच लढाईत. त्यांणीं हैदराला अगदीं जेरीला आणला. अखेर त्याणें तह केला. हें पाहा तेथील एका व्यापाऱ्याचें पत्र आलें आहे. वाचा येथून.

( उघडून त्याच्या हातीं देतो )

**जनार्दनपंत**— ( मोठ्यानें वाचतो ) " तुह्मास कळविण्याजोगी आमच्याकडे बातमी ही आहे. हैदरानें तहाचें बोलणें लाविलें. त्यास श्रीमंतांचे आज्ञेवरून मामासाहेब कबूल झाले. तो तह ऐसाजे " पूर्वी छत्रपति शिवाजी महाराज यांचे वेळेस कर्नाटकाचा जितका भाग मराठ्यांकडे होता तितका आतांही असावा. खेरीज मदगिरी आणि गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्यांजकडे असावे, खेरीज तूर्त लष्कर खर्चाबद्दल मराठ्यांस छत्तीस लाख रुपये पोंचावे. खेरीज दरसालीं चौदा लाख रुपये खडणी ह्मणोन द्यावे. यास अंतर होऊं नये. " ( कांहीं थांबून ) एकून असें झालें, हैदराच्या उदयचंद्राआड ढग आलीं. शाबास, मोठी आनंदाची गोष्ट. जिकडे तिकडे आता लोक खुशालतील.

**कृष्णाजीपंत**— ( उसासा टाकून ) पण दुसरी बातमी तुह्मी नाहीं ऐकिली. हिजपासून जितका आनंद झाला तितकेंच किंमानपक्ष अधिक तिजपासून दुःख होईल. भगवान् त्या पुरुषाचें संरक्षण करो.

जनार्दनपंत— कायहो काय ह्मणतां, मी नाहीं समजलों.

कृष्णाजीपंत— श्रीमंतांना कफोद्भव होऊन प्रकृति अत्यंत बिघडली आहे. तूर्त स्वारी थेऊरास आहे. काल रमाबाईसाहेब तावडतोब निघोन गेल्या. असा प्रकार आहे. नाहींतर हैदर येव्हां धुळीस मिळाला असता.

जनार्दनपंत—असें काय? अरेरे? या दुःखाखालीं तो आनंद रसातळास बुडाला. देवा, त्या जिवाचें संरक्षण कर. कृष्णाजीपंत,तो प्राणी गेला तर दुसरें तर काय परंतु केवळ महाराष्ट्राचें आज कुंकू गेलें असें समजावें.

कृष्णाजीपंत— वास्तविक. माधवराव गेले असतां आमच्या देशाचा प्रकाशदाता सूर्यनारायणच अस्तासगेला यात संशय नाहीं.

जनार्दनपंत— आयुष्याची जर वांटणी करितां येती तर माझें मी निमें आयुष्य त्या दयावंत प्रजापालकास दिलें असतें.

कृष्णाजीपंत— तसें होईल तर माझें मी पाऊण आयुष्य द्यावयास आतां या क्षणीं तयार आहें. अरे, पण असे दुर्विचार आमच्या मनांत कां उभे राहतात? ईश्वर सर्व दुर्विघ्नें नाहींशीं करो. मी तर श्रीमंतांच्या दर्शनास आतां थेऊरास जाणार.

जनार्दनपंत— चला मी ही येतों. अशा धन्य पुरुषाचे दर्शनासारिखा अवांतर कोणता लाभ आहे? चला. ( निघोन जातात )

## प्रवेश ६.

### येऊर राजवाडा.

माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, सखारामपंत, वैद्य, आणखी दुसरे पुष्कळ बडे लोक.

**सखारामपंत व रघुनाथराव** — ( बाहेरून येऊन ) श्रीमंताची प्रकृति आतां कशी आहे ?

**वैद्य**— हळू;— आतां येव्हां थोडी उगीच डुलकी लागली आहे. बसावें.

**सखारामपंत**— ( रघुनाथरावास ) हळू, निद्रा लागली आहे. बरेंच आहे.

**रघुनाथराव**— होहो. निद्रा चांगलीच.

( माधवरावास स्वप्न पडतें. )

स्वप्नामध्यें प्रथम तीन विमानें स्वर्गाहून खालीं उतरतात. एकांतून लक्ष्मीनारायण, दुसऱ्यातून ईश्वरपार्वती आणि तिसऱ्यांतून ब्रह्मासावित्री असे येतात. त्यांजबरोबर चवथें रिकामें विमान उतरतें. मागून गंधर्व गायन करीत येतात. माधवराव त्या सर्वांस साष्टांग नमस्कार घालतो व ते त्यास अनुक्रमें आशिर्वाद देतात. त्याच्या मस्तकावर हात ठेवितात, नंतर त्यास आलिंगन देऊन पुनः आशिर्वाद देतात. शेवटीं रिकामें विमान व पांच गंधर्व खेरीज करून बाकी सर्व पुनः स्वर्गास निघोन जातात. तें विमान व पांच गंधर्व अदृश्य होऊन तेथेंच राहतात. इतकें झाल्यानंतर माधवराव जागृत होतो.

**माधवराव**— सर्व गेले ? त्यांच्या दर्शनानें मला किती आनंद झाला. दैवहीन, अभागी, मी; मींच कसा येथें राहिलों !

**वैद्य**— नाहीं श्रीमंत, सर्व येथेंच आहों. आमच्या हातून सर्कारचाकरींत तिळमात्र अंतर पडावयाचें नाहीं.

**माधवराव**— तुह्मी आहां ठीक आहे. परंतु मी तुह्मास बोललों नाहीं.

**वैद्य**— तर श्रीमंत आह्माशिवाय दुसरें कोणी येथें आलें नव्हतें.

**माधवराव**— कोणी नव्हतें ? तर मग त्या देवाधिदेवांनीं मला स्वप्नांत दर्शन दिलें काय ? हे भगवान् लक्ष्मीनारायण, हे ईश्वरपार्वती, हे ब्रह्मासावित्री, महान्महान् संतांस ज्या पदाचें दर्शन अलभ्य, तीं पदें आज माझ्या दृष्टीस पाडिलीं. त्या पदांचीं चिन्हें आज माझ्या खोलींत उमटलीं. हे प्रभो, मी दास होऊन गायन करीत बरोबर आलों असतों. मला का टाकून गेलां ?

**रघुनाथराव**— हें काय बोलतां माधवराव !

**माधवराव**— दादा केव्हां आला ? मला स्वप्नांत त्या देवतांचें दर्शन झालें. त्यांनीं आशिर्वादही दिले. ह्मणून असें ह्मणतों.

**सखारामपंत**— स्वप्न फार उत्तम आहे. श्रीमंतांनीं दुखण्याची काळजी करूं नये.

**माधवराव**— सखारामपंत, या दुखण्यांतून मी आतां बरा होईन ही आशाच नको. माझा अंतकाळ समीप आला. तुमच्या आमच्या गांठी तास अर्धतास पर्यंतच. या अंतकाळच्या दुखण्यापासून मला किंचित् ही दुःख होत नाहीं. मी जरी पाप्याचा राजा आहें तरी आतां त्या स्वप्नापासून मला आश्वासन प्राप्त झालें आहे. मजकडे भगवंतानें दृष्टि देऊन मला पाप

विमुक्त केलें आहे. मी आतां या क्लेशस्थानापासून निष्कलंक आनंद ज्या ठिकाणीं नांदतो त्या ठिकाणीं चाललों. वैकुंठीच्या राज्याजवळ चाललों. त्या ठिकाणीं नारायणाचें अखंडित भजन पूजन करीन. तेंच माझें जीवन होईल. हे यमा तुझा पाश कोठें आहे मला तर मुळींच भासत नाहीं. पाहा दादा, सखारामपंत पाहा. माझे पाय गार पडत चालले.

**सखारामपंत—** श्रीमंत, अशी दुष्ट वाणी कां उच्चारिता ?

**रघुनाथराव—** माधवराव, अगोदरच आमच्या छात्या फुटल्या, आणि वर शब्दाचे वज्रघात नकोरे बाळा मारूं.

**माधवराव—** माझ्याविषयीं तर मला कांहींच वाटत नाहीं. परंतु दादा, तुह्मास एक गोष्ट सांगणें आहे. नारायणा, इकडेये ( त्याचे डोळे पुसून ) हा वेड्या. दादा याजकडे पाहा. या मुलाचा सांभाळ करा. माझ्या हातून लोककल्याण व्हावें तसें झालें नाहीं. याच्या हातून तरी करवा. मी सांगावें असें नाहीं. परंतु काय करूं राहवत नाहीं. तुह्मा उभयतांचें एकचित्त असल्यास, तुमचा स्नेह उत्तरोत्तर दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेल्यास आपल्या कुळाचें नांव चिरकाळ राहील. सखारामपंत, तुमच्या सारिखे कारभारी आता याना मिळणार नाहींत. घ्या हें शिक्का मोर्तब घ्या, आजपासून राज्याचे कारभारी तुह्मी व्हा.— आतां माझ्यानें बोलवत नाहीं. पाहा तें विमान व गंधर्व माझी वाट पाहात उभे आहेत. ( माधवरावास गंधर्व दिसू लागतात ) जाऊं द्या, आतां

मला जाऊं द्या. एकदां तिच्याशीं बोलायाचें होतें. प-रंतु ती तर मूर्छा येऊन पडली आहे. किंवा मजबरो-बर येण्याचा निश्चय करून त्यासतीनें देह ठेविला, कोण जाणें—होय गंधर्व माना डोलवितात. शाबासबाई; आता आपण उभयतां त्या सच्चिदानंदाच्या आनंदांत मिळून जाऊं. येतों येतों आता निघतों. माझी प्रजा सुखीराहो. दादा, अंतकाळींचे माझे आशिर्वाद त्यांस कळवा. माझें उत्तरकार्य नीट होऊं द्या. नारायणा रडूं नको, दादा रडूं नका. सखारामपंत हें काय ? तुह्मी सुखी असा, हें सर्व राज्य सुखी असो. माझें चित्त कोणी ढळवूं नका. मी आतां बोलणार नाहीं. हे भगवान् ! राम — राम— राम— ( अखेर मोठ्यानें ) राम.

( प्राणजातो )

## प्रवेश ७.

आंतल्या बाजूची खोली.

रमाबाई मूर्छा येऊन पडली आहे. रमाबाईची आई, आनंदीबाई, आणखी दुसऱ्या बाया जवळ बस-ल्या आहेत. कांहीं अंतरावर सखारामपंत, रघुनाथराव, आणखी कित्येक येऊन बसतात.

**जवळच्याबाया**— बाईसाहेब सावध व्हा. सावध व्हा, लोक एका संकटांत आहेत तों हें दुसरें उभें राहिलें. बाईसाहेब—( असें ह्मणून एकच आकांत करितात. )

**सखारामपंत**— बायानों, इतका आकांत करूं नका. अशानें त्या शुद्धीवर येणार नाहींत. गलबा कमी करा. हे देवा, काय हें.

**रमाबाई**—नाहीहो सखारामपंत. ती शुद्धी-
**चीआई** वर येत नाहीं. माझी बाई चालली चालली. आता मी काय करूं? दोघांनाही माझा कसा कटाळा आला. बाईबाई माझ्यावर आकाश गडगडून पडलें.

**रमाबाई**—(सावध होऊन) जळो माझें देव. मी चांडाळिण कशी जन्मास आल्यें. आज मला सोडून कसें जाणें झालें. हे तुळशीआई मी कोणतें पाप केलें. रेदेवा आज मजवर हा कसा प्रसंग आणिलास? हा दिवस पाहाण्यास मी कशी वांचल्यें. पती पूर्वी ज्या सवाष्णी मरतात त्या धन्य होतात. आतां मी काय करू? हाय हाय एकही आज्ञा मी भंगिली नाहीं एकही वाकडा शब्द मी बोलल्यें नाहीं. आतां मी कसे दिवस कंठू? हे माते धरित्री, घे, मला अनाथाला तू आपल्या पोटांत घे.

**आई**—धरा आवरून धरा. तिला देहाची शुद्धि नाही. बया असा हंबरडा फोडू नको. मज म्हातारीवर देव कसा कोपला?

**रमाबाई**—आई आतां मी येथें राहात नाही. माझ्या शिवाय घटका भर करमत नव्हतें. मलाही करमत नव्हतें. यासाठीं मी जात्यें, मी बरोबर जात्यें. मी सहगमन करत्यें. माझे अवयव मात्र येथें आहेत. जीव सगळा त्या शरीरांत घुटमळला आहे. झाला हाच माझा निश्चय. मी बरोबर जाणार. करा माझी तयारी करा.

**इतरबाया**—बाई साहेब असें करू नका. देवानें व्हावयाचें तें झालें. आह्मास धनी नाहींसे झाले;

आणि आमची धनीणही का नाहीशी करितां?

**आई—** नको नको. मग माझा प्राण कसा राहील. घरधनी गेले तेव्हां तुह्मी होते होतां. आतां त्यानींही सोडिले. माझे आई तू तरी सोडूं नको. तूं तरी राहा. तुमच्या सर्वांच्या दुःखाचा भार मी ह्मातारी कसा वाहूं. ऐकऐक. पुरे. नको हट्ट धरूं.

**रमाबाई—** आई असें भलतेंच सांगू नको. तुझें ह्मातारपण झालें आहे. संसारातील दुःखातून तूं लवकरच मुक्त होशील. परतु माझें आतासें तारुण्य आहे, मी जर आता तुजकरितां राहिल्यें, तर मग एक दोन वर्षानतर तूं गेलीस ह्मणजे मग हे पाय तर अंतरलेच पण तूंही अंतरशील. मग निराधारी, निराश्रित, हें काळें तोंड घेऊन, वैधव्य पदरीं बांधून लपण्यास देखील जागा उरणार नाहीं. आता गेल्यें तर लोकात कीर्ति करून जाईन. मग गेलें तर मजकरिता कुत्रा देखिल रडणार नाहीं. आई या मायापाशात तूं पडूं नको; करा माझी तयारी करा. आणागे माझें पाढरें पातळ, आणून मला नेसवा. माझी दागिन्याची पेटी आणून सर्व अलकार मजवर घाला. माझा कुकुवाचा डबा आणून मला मळवट भरा. ओंटीचें तबक आणून माझी ओंटी भरा. मला जाऊन लवकर भेटू द्या. जलदी करा माझी वाट पाहाणें होत आहे. अंबाबाईनें विमान पाठविलें आहे. ( तिला विमान दिसू लागतें ) बरोबर गधर्व आहेत. विमान माझीच वाट पाहात आहे. आटपा मी निघाल्यें.

( सर्व तयारी झाल्यानंतर स्वाऱ्या निघतात. )

## प्रवेश ८.

दहनाचें ठिकाण.

**ब्राह्मण**— चिता रचिली. आतां प्रवेश करण्याचा समय आला.

**बाया**— बाईसाहेब दया ठेवा. आपण अक्षय सुख भोगण्यास चाललां. दया ठेवा.

**रमाबाई**— सुखी असा. आपआपल्या पतींसहवर्तमान सुखी असा.

**रघुनाथराव**— रमाबाई चाललीस क्या ? तूं आपल्या देहाचें सार्थक केलेंस. आह्मालामात्र दुप्पट दुःख होतें.

**रमाबाई**— मामाजी नमस्कार करित्यें.

**नारायणराव**— वैन्ही तुह्मी चालला ? मी नमस्कार करितों; आतां मी वैन्ही ह्मणून कोणाला हाक मारूं ?

**रमाबाई**— भाओजी, जा आतां राज्यकरा. तुमच्याकडे पाहून तरी लोकाना आमची आठवण होवो, त्यांस आमचा विसर पडेल असें करा.

**नारायणराव**— नको, मला तें राज्य नको, तीमजा नको, तो जीव ही नको.

**रामशास्त्री**— हे सुपतिव्रते रमाबाई, धन्य जोडा स्त्रीजातीला तू भूषण खरी. नको. तू नमस्कार न केलासतरी चालेल, तुलाच आह्मी नमस्कार करावे. हे देवी, देव तुजवर पुष्पवृष्टि करोत.

**रमाबाई**— मी सर्वांना नमस्कार करित्यें— हे भगवान् नारायणा, वसिष्ठअरुंधतीच्या दर्शनासाठीं, स्वर्गी पतिसहवर्तमान अखंडवर्षें वास करण्यासाठीं,

सासर व माहेर हीं दोन्ही कुळें उद्धरण्यासाठीं, आमच्या हातून जे अन्याय, ज्या हत्या, झाल्या असतील त्यांच्या निवारणासाठीं, मी आज पतीशीं सहगमन करित्यें. हे इंद्र, चंद्र, सूर्य, अग्नि, वायो, कृपा असों द्यावी. हे राजाधिराज यमधर्मा आपलीही कृपा असावी. (लोकाना) येत्यें आतां. आमच्या मीनीत जसा भंग होणार नाहीं तसा तुमच्यांत ही न होवो. येत्यें.

(प्रवेश करित्ये)

लोक— गेली गेली विश्वजननी, आमची माताश्री गेली. आज आमच्या राज्याची लक्ष्मी गेली, शोभा गेली. आज आमच्या संकटास आरंभ झाला. धन्यधन्य हे माउली तूं धन्य. तुजविण आह्मी परदेशी झालों. आतां आमचें कोण पालन करील तें करो.

(सर्व दुःख करीत निघून जातात.)

---

समाप्त.

रंगभूमी